पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ८५ ● गुरूवार, दि १ ऑक्टोबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

मेहनतीवर विश्वास ठेव, नशिबावर नाही: स्वतःच्या कष्टाने मिळवलेले यश टिकून राहते.

सिटी न्यूज सुपरफास्ट
बाळापुर शहरात
अंक मिळण्यासाठी व जाहिराती साठी
संपर्क
रविंद्र वखरे
शहर प्रतिनिधी
+91 7798750195



प्रा. अदिती पोहरे यांचा आज दूपारी मुंबईत काँग्रेसमध्ये प्रवेश झाला. महाराष्ट्र प्रभारी डॉ.सिरिवेल्ला प्रसाद यांच्या पदग्रहण सोहळ्यात हा पक्षप्रवेश झाला. यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,मुकूल वासनिक यांची उपस्थिती होती. अमरावती शिक्षक मतदार संघाची उमेदवारी त्यांना घोषित झाली असून त्या लवकरच त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल करतील.

# दुष्काळापेक्षा महागाईच्या चटक्यांनी जनता होरपळली

## कांद्याचे दर थेट ८० रुपये प्रतिकिलोवर पोहोचले

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोला :** सध्या जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्यामुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, शेतकरी संकटात सापडला आहे. परंतु, निसर्गाच्या लहरीपणापाठोपाठ आता सर्वसामान्य जनतेला महागाईच्या तीव्र चटक्यांचा सामना करावा लागत आहे. दुष्काळाच्या संकटापेक्षा महागाईच्या झळांनी सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत झाले असून, 'अन्न व औषध विभाग, पुरवठा विभाग आणि विपणन विभाग नेमके करते तरी काय?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. बाजारात कांद्याचे भाव गगनाला भिडल्यामुळे सर्वसामान्यांच्या ताटातील कांदा अक्षरशः गायब झाला आहे.

### साठेबाजांवर कारवाईची मागणी

एकीकडे दर गगनाला भिडलेले असतानाच, बाजारात विक्रीसाठी येणाऱ्या कांद्याच्या गुणवत्तेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अनेक ठिकाणी काळ्या बुरशीचा आणि खराब दर्जाचा कांदा चढ्या भावाने विकला जात असल्याच्या तक्रारी नागरिकांमधून येत आहेत. ऐन सणासुदीच्या आणि कठीण काळात नागरिकांची ही लूट थांबवण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलणे गरजेचे बनले आहे. दिवाळीच्या तोंडावर कांद्याची झालेली दरवाढ कायम राहण्याची शक्यता आहे. पुढील महिन्यात कांदाचा दर हा १५० रुपये किलो होतो काय असा प्रश्न गृहिणींना पडला आहे.या दरवाढीमागे व्यापाऱ्यांची साठेबाजी तर कारणीभूत नाही ना, याचा शोध घेणे आवश्यक आहे. त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती आणि जिल्हा प्रशासनाने तातडीने कठोर पावले उचलत कांद्याचे कृत्रिम वाढीव दर रोखावेत आणि बाजारातील कांदा साठेबाजांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी सर्वसामान्य जनतेकडून जोर धरत आहे. पुरवठा विभागाने या संपूर्ण प्रकरणाची तातडीने दखल घेऊन दर नियंत्रणात आणावेत अशी मागणी पुढे येत आहे.

### कांदा पुन्हा रडवणार ?

पाऊस वेळेवर न पडल्यामुळे नवीन पीक बाजारात येण्यास मोठा विलंब झाला आहे. त्यातच बाजारात मालाची आवक रोडावल्याने कांद्याचे दर थेट ८० रुपये प्रतिकिलोवर पोहोचले आहेत. किरकोळ बाजारात सध्या कांदा ८० रुपये दराने विकला जात आहे. मात्र, मागणीच्या तुलनेत मालाचा पुरवठा अत्यंत घटलेला असल्याने आगामी काही दिवसांत हे दर आणखी वाढून ८० रुपयांपेक्षाही अधिक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. विक्रेत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बाजारातील सध्याची स्थिती पाहता नजीकच्या काळात कांद्याच्या दरात घट होण्याची कोणतीही चिन्हे दिसत नाहीत.



### काळ्या कांद्याने होतात वांदे

कांद्यावर साचणारी काळी बुरशी खाणे आरोग्यासाठी पूर्णपणे सुरक्षित नाही. अन्न आणि आरोग्य तज्ज्ञांच्या मते, या स्थितीबाबत खालील गोष्टींची काळजी घेणे अत्यंत गरजेचे आहे. कांद्याच्या बाहेरच्या पापुद्र्यावर जी काळी पावडर किंवा डाग असतात, त्याला 'ॲस्परगिलस नायजर' असे म्हणतात. दमट किंवा अयोग्य साठवणुकीमुळे ही बुरशी वाढते. ही बुरशी काही प्रमाणात 'मायकोटॉक्सिन'नावाचे विषारी घटक तयार करू शकते, जे शरीरात गेल्यास दीर्घकाळात यकृत आणि मुतपिंड यांसारख्या महत्त्वाच्या अवयवांवर विपरीत परिणाम करू शकतात. बुरशी केवळ वरच्या पापुद्र्यावर असेल आणि कांदा आतून पूर्णपणे कडक, निरोगी असेल, तर वरचे खराब झालेले आवरण काढून टाकून आणि कांदा स्वच्छ धुऊन तो वापरता येऊ शकतो.महागाईमुळे कांदा महागला असला, तरी खराब किंवा जास्त बुरशी लागलेला कांदा खाऊन प्रकृती धोक्यात आणण्यापेक्षा सुरक्षित आणि चांगला कांदा निवडणेच कधीही उत्तम.

# पार्थ पवार आरोपी का नाही?

प्रतिनिधी १ ऑक्टोबर



**पुणे :** पुण्यातील मुंढवा येथील तब्बल ४० एकर शासकीय जमिनीच्या कथित गैरव्यवहार आणि कोट्यवधी रुपयांच्या मुद्रांक शुल्क चोरीप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने तपास यंत्रणेच्या पक्षपाती भूमिकेवर तीव्र शब्दांत ताशेरे ओढले आहेत. संबंधित वादग्रस्त जमिनीचा व्यवहार करणाऱ्या 'अमेडिया एंटरप्रायझेस एलएलपी' या भागीदारी फर्ममध्ये चक्क ९९ टक्के हिस्सा असतानाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांना या प्रकरणात आरोपी का बनवले नाही? असा थेट सवाल उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकलपीठाने उपस्थित केला आहे. केवळ १ टक्का भागीदारी असलेल्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करायचा आणि मूळ ९९ टक्के मालकी असलेल्या बड्या राजकीय नेत्याच्या मुलाला अभय द्यायचे, या पुणे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर न्यायालयाने तीव्र आश्चर्य व नाराजी व्यक्त केली.

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायमूर्ती माधव जामदार यांनी तपास अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर बोट ठेवत सवालांची सरबत्ती केली. 'एलएलपी भागीदारी संस्थेमध्ये ज्या व्यक्तीची मालकी तब्बल ९९ टक्के आहे, त्यांना या कोट्यवधींच्या जमिनीच्या व्यवहाराची माहिती नव्हती का? जर हा व्यवहार यशस्वी झाला असता, तर त्याचा खरा लाभार्थी कोण ठरला असता? १ टक्का हिस्सा असणारा की ९९ टक्के हिस्सा असणारा?' असा खडा सवाल न्यायालयाने केला. न्यायालयाने निरीक्षण नोंदवताना स्पष्ट केले की, पार्थ पवार हे अत्यंत प्रभावशाली व्यक्ती आहेत आणि ते विद्यमान उपमुख्यमंत्र्यांचे सुपुत्र आहेत. असे असताना केवळ १ टक्का भागीदारी असलेले संचालक दिग्विजय पाटील यांना आरोपी केले गेले, मात्र ९९ टक्के मालकी असलेल्या मुख्य भागीदाराला तपासातून पूर्णपणे बाजूला ठेवणे अत्यंत संशयास्पद आहे. उच्च न्यायालयाच्या या कडक भूमिकेमुळे आणि पोलीस महासंचालकांना दिलेल्या स्पष्ट निर्देशांमुळे आता पुणे पोलीस मुंढवा जमीन प्रकरणात पार्थ पवार यांच्यावर काय कारवाई करतात आणि त्यांचा आरोपी म्हणून समावेश करतात का, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## »थोडक्यात

### मनोज जरांगेंना आणखी एक झटका!

**जालना :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषण करुन अनेकदा महायुती सरकारला जेरीस आणणारे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या सहकाऱ्यांभोवतीचा चौकशीचा फास आता आणखी आवळला जाताना दिसत आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनातील अनेक सहकारी अचानक आयकर खात्याच्या रडारवर आले होते. त्यांच्या संपत्तीची चौकशी होणार असल्याची माहिती पुढे आली होती. परंतु, आता हे प्रकरण त्यापेक्षाही वाढणार असल्याचे दिसत आहे.

---

### एलपीजी सिलिंडर ६२ रुपयांनी महागला!

**दिल्ली :** ऑईल मार्केटिंग कंपन्यांनी १ ऑक्टोबरच्या सकाळी एलपीजी सिलिंडर्सच्या किंमतींमध्ये बदल केले असून नव्या किंमती जारी केल्या आहेत. नवरात्रौत्सवाच्या काही दिवसांवरच आला असताना हा महागाईचा झटका अनेकांचं बजेट कोलमडवणारा ठरतोय. दरम्यान, तेल कंपन्यांनी १९ किलोंच्या कमर्शियल एलपीजी सिलिंडरचे तब्बल ६२.५० रुपयांनी दर वाढवले आहेत. तर, घरगुती सिलिंडर्सच्या किंमती मात्र, स्थिर ठेवण्यात आल्या आहेत.

**CLASSIFIED**

**पाहिजेत**

Myntra कंपनी करिता डिलिव्हरी बॉय पाहिजेत
- साई नगर रूट
- तपवन रूट
- गोपल नगर

**आमचा पत्ता**
मोती बाग जवड मोती नगर
अमरावती 444606
संपर्क 8626048727

# लोकशाही वाचवण्यासाठी आम्हीही रस्त्यावर उतरणार - नाना पटोले!

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**मुंबई :** देशातील लोकशाही वाचवण्यासाठी काँग्रेस पक्ष रस्त्यावर उतरणार आहे. उद्धव ठाकरे यांनी ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत जे जनआंदोलन पुकारले आहे, त्यामध्ये काँग्रेसचे कार्यकर्ते आणि नेते प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहभागी होतील.

दिवसाढवळ्या लोकशाहीची हत्या केली जात असून, निवडणूक आयोगाकडून भाजपला उघडपणे फायदा पोहोचवला जात आहे. त्यामुळे लोकशाही मानणाऱ्या सर्वांनीच आता रस्त्यावर उतरण्याची वेळ आली आहे, अशी पक्षाची भूमिका काँग्रेस नेते नाना पटोले यांनी माध्यांशी बोलताना स्पष्ट केली.



मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराविरोधात देशभरातील विरोधी पक्षांमध्ये तीव्र संताप पाहायला मिळत आहे. याच पार्श्वभूमीवर येत्या ४ ऑक्टोबर रोजी मुंबईत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली एक मोठे आंदोलन पुकारण्यात आले आहे. उद्धव ठाकरे यांनी या मोर्चासाठी इतर विरोधी पक्षांनाही सोबत येण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसने या आंदोलनात सहभागी होण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण करत आता ठाकरे बंधूंच्या खांद्याला खांदा लावून काँग्रेसही मैदानात उतरणार असल्याने, राज्यभरातील राजकीय वर्तुळाचे लक्ष या आंदोलनाकडे लागले आहे. यावेळी बोलताना पटोले यांनी लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या भूमिकेची आठवण करून दिली. ज्याचा थेट फायदा भाजपला होत आहे. याविरोधात राहुल गांधी सुरुवातीपासूनच लढा देत आहेत. ही मूळ लढाई काँग्रेसचीच असून ती आम्ही प्राणपणाने लढत आहोत, असे पटोले म्हणाले. ४ ऑक्टोबरचा हा मोर्चा केवळ ठाकरे बंधूंचा किंवा राजकीय पक्षांपुरता मर्यादित राहू नये, तर ते एक व्यापक 'जनआंदोलन' व्हावे, अशी अपेक्षा काँग्रेसने व्यक्त केली आहे.

कर्जावर किफायतशीर व्याजदर*

दि. 01-10-2026 पासुन लागु



डॉक्टर्स लोन
7.90%*



चार चाकी वाहन कर्ज
8.00%*

नको जमानत बिना कामी कर्ज परतीची हवी हमी...



हाऊसिंग लोन (फिक्स)*
No Prepayment Charges
8.50%*



गोल्ड लोन
9.25%*

Hypothication Loan (Working Capital Limit) 8.50%*



Secured Cash Credit Limit (Against Property) 9.50%*



LAIP (Property Loan) 10.50%*

FREE No Cheque Book Charges*

FREE No RTGS / NEFT Charges*

अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधावा

दि अकोला जनता कमर्शियल को-ऑप.बँक लि; अकोला
स्थापना : १९६९
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
मुख्य कार्यालय : ''जनवैभव'', जुने कॉटन मार्केट, अकोला (महाराष्ट्र) ४४४००१ | Website : www.akolajanata.bank.in | E-mail : customercare@akolajanata.bank.in

* अटी व शर्ती लागू.

# तुम्हीच खरे हीरो - बिन्यामिन नेतान्याहू

## भारतीय पायलटचे कौतुक, १७४ प्रवाशांचे वाचविले प्राण

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**मुंबई :** असाधारण शौर्याबद्दल भारतीय वैमानिक कॅप्टन स्मित मच्छार यांना माझा सलाम. चाकूने हल्ला होऊन गंभीर जखमी झालेले असतानाही त्यांनी लढा दिला, प्रतिकार केला, कॉकपिटचा दरवाजा उघडला आणि प्रवासी व क्रू मेंबर्सना हल्लेखोराला ताब्यात घेण्यास मदत केली. यामुळे हवेतील एक मोठा भीषण अपघात टळला. त्यांनी इस्रायली नागरिकांसह इतर देशांच्या १७४ लोकांचे प्राण वाचवले. मी कॅप्टन मच्छार यांच्या लवकर आणि पूर्ण बरे होण्यासाठी सदिच्छा व्यक्त करतो. ते खरे हिरो आहेत, असे गौरवोद्गार इस्राईल पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी भारतीय पायलट स्मित मच्छार यांच्याविषयी काढले.



दुबईहून तेल अवीवला जाणाऱ्या फ्लायदुबईच्या विमानात बुधवारी थरार घडला. दोन वैमानिकांमध्ये झालेल्या झटापटीत एक वैमानिक जखमी झाला. मात्र, अशाही परिस्थितीत या वैमानिकाने प्रवाशांचे प्राण वाचवले. महत्त्वाचे म्हणजे आंतरराष्ट्रीय स्तरावर उड्डाण करणारा हा वैमानिक भारतीय आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे मुंबईकर आहे. अशा या वैमानिकाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असताना इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनीही त्यांचे कौतुक केले. तसेच, या वैमानिकाला मदत करणाऱ्या प्रवाशाला सिंहाची उपमा दिली. कर्तव्यावर असलेल्या क्रू मेंबर्सने विमान सुरक्षित केले, त्याचा मार्ग बदलला आणि सौदी अरेबियामध्ये सुरक्षितपणे उतरवले.

### आपला सिंहांचा देश!

» नेतन्याहू यांनी उत्तर दिले, 'हाच आदर आहे, तुम्हीच आदरास पात्र आहात, तुम्ही नायक आहात, तुम्ही हे कसं केलं?' त्यावर प्रवाशाने उत्तर दिलं, 'आपला सिंहांचा देश आहे, नाही का?' त्यानंतर नेतन्याहू म्हणाले की त्यांना एक मोठा हिरो दिसत आहे आणि शर्टवरील रक्ताच्या डागांकडे बोट दाखवत विचारलं, 'वॉव, हे रक्ताचे डाग त्यांचे (सह-वैमानिकाचे) आहेत का?', यावर प्रवाशाने उत्तर दिलं, 'हे त्यांचेच आहे, होय.'



कॅप्टन मच्छार हे खरे हीरो आहेत. सर्वात मोठ्या संकटाचा सामना करताना आणि स्वत: गंभीर जखमी झालेले असतानाही, कॅप्टन स्मित मच्छार यांनी इतरांचे प्राण वाचवण्यासाठी अपार धैर्य आणि दृढनिश्चय दाखवला. त्यांच्या या शौर्यामुळे शेकडो प्रवाशांचे प्राण वाचले आणि एक मोठी दुर्घटना टळली. संपूर्ण भारताला कॅप्टन मच्छार यांचा अभिमान आहे. ते लवकरात लवकर बरे व्हावेत, त्यांना उत्तम आरोग्य लाभो हीच प्रार्थना, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर पोस्ट करत म्हटले.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# जिल्ह्यावर भीषण दुष्काळाचे सावट



यावर्षी भारतीय हवामान प्रणालीवर प्रचंड प्रभाव टाकणाऱ्या एल निनोने भारतासह महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या शेतीचे पूर्णतः गणित बिघडवून टाकले आहे. 1972 नंतर यावर्षी पडलेला भीषण दुष्काळ शेतकऱ्यांना जवळपास दहा वर्षे मागे घेऊन जाणार आहे त्याचे कारण यावर्षी सुरुवातीपासून शेतकऱ्यांनी शेतीवर केलेला प्रचंड खर्च ,जवळ असलेला होता नव्हता तो पूर्ण पैसा शेतीमध्ये आशेने टाकला असून मात्र दुष्काळी परिस्थिती मुळे त्याला परतावा म्हणून काहीच पदरात पडले नसल्याचे भयावह चित्र राज्यभर पहावयास मिळत आहे।महाराष्ट्रातील विशेषतः अकोला जिल्ह्यातील परिस्थिती भीषण आहे ,सोयाबीन पिकाचे उत्पन्न पातूर तालुक्यात बऱ्याच गावात हे शून्य आहे

पावसात पडलेला 60 ते 70 दिवसाचा खंड हे याचे मुख्य कारण आहे। मात्र सरकार अजून सुद्धा शेतकऱ्यांच्या प्रति गंभीर नसल्याचे चित्र पहावयास मिळत आहे। शेतकऱ्यांच्या पुढे जमनावरांच्या चार्यांचा व पिण्याच्या पाण्याचा भीषण प्रश्न निर्माण झाला आहे कारण तालुक्यातील सर्वच प्रकल्प हे पन्नास टक्के पेक्षा कमी भरलेले असून नदीकाठावरील सर्व विहिरींची पाणी पातळी खोल गेल्याने विहिरी सुद्धा उपशयावर आल्याने भविष्यात शेतातील कपाशी,हळद, केळी, व फळबागा पुढील वर्षीपर्यंत कशा जिवंत ठेवाव्यात हा प्रश्न शेतकर्यांसमोर निर्माण झाला आहे,आता उपसा सिंचनासाठी पाणी मिळणे कठीण आहे मात्र तालुक्यातील विविध प्रकल्पाचे पाणी नदीपात्रात महिन्यातून किमान एकदा सोडल्यास गुराढोरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे यासाठी आजपासूनच प्रचंड नियोजन लागणार असून त्यासाठी प्रशासनाच्या काहीच हालचाली सध्यातरी दिसून येत नाही आहेत। बाजूच्या जिल्ह्यातील भरलेल्या सिंचन प्रकल्पाचे पाणी कालव्याद्वारे गावागावात पिण्यासाठी उपलब्ध करून दयावे,जनावरांना दहा महिने पुरेल इतका चारा उपलब्ध करावा,शेतकरी, शेतमजूर यांच्या हाताला किमान सहा महिने काम मिळेल यासाठी रो ह यो चे कामं हाती घ्यावेतभविष्यात अशी पाणी टंचाई निर्माण होऊ नये यासाठी गावांगावात नदी,नाले खोलीकरण,बंधारे,यांची कामं लवकर सुरू करावीत,वाटर हार्वेस्टिंग साठी उपाय योजना कराव्यात तसेच मागेल त्याला विहिरी व शेततळे योजना प्रभावीपणे राबवावी

यासाठी आतापासून कृती आराखडा तयार करून लगेच वरील सर्व कामे तात्काळ सुरू केल्यास भविष्यात प्रत्येक गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकतो मात्र शासन सदरील बाबीविषयी उदासीन दिसत आहे।शेतकर्यांसमोर हे एक चालू वर्ष व पुढील पीक येईपर्यंत असे एक वर्ष म्हणजे दोन वर्षाचे आर्थिक नियोजन करणे फार जिकरीचे काम होणार आहे त्यासाठी सरकारने भक्कमपणे त्याच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे

विनोद राऊत
शेतकरी, संघटना अकोला

शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी किमान 70 हजार रु व 100 टक्के पीक विमा द्यावा,नमो शेतकरी सन्मान निधी,पी एम किसान योजनेचे बाकी राहलेले अनुदान त्वरित द्यावे जनेकरून शेतकरी त्या पैशातून आपल्या कुटुंबाचे पालन पोषण वर्षभर करू शकेल

मात्र सरकार जाणीवपूर्वक याकडे लक्ष देत नसल्याने शेतकरी व शेतमजूर वर्गात प्रचंड रोष पहावयास मिळत आहे। दुसरीकडे शेतसारा माफ ,शालेय फी माफ अशा घोषणा सरकार करत असून प्रत्यक्षात शेतसारा हा एकरी दहा रु ते जास्तीत जास्त वार्षिक पन्नास रु प्रयन्त असतो तसेच शालेय फी फक्त सरकारी शाळेत शिकणाऱ्या दहावी बारावी मधील विद्यार्थ्यांची माफ होईल व ती सुद्धा हजार दोन हजार रु असते त्यामुळे अशा घोषणा करून सरकार आम्ही काहीतरी मोठी रक्कम माफ करण्याचा भंकपपना दाखवत आहे हे यातून स्पष्ट होतं आज ग्रामीण भागातील बऱ्याच शेतकऱ्यांची मुले खासगी शाळेत शिकतात त्यांच्या फी चे काय त्यांची शालेय फी,गाडीभाडे असा खूप खर्च असल्याने सरकार याबाबत काय उपाययोजना करणार हे पाहणे सुद्धा महत्वाचे आहे जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी पीक विमा नक्की किती द्यावा यासाठी प्रत्येक गावात पीक कापणी प्रयोग चूपचाप कृषी व महसूल विभागातील अधिकारी कर्मचारी करत आहेत या कापणी प्रयोगातून आलेल्या उत्पादनावर यावर्षी चा पीक विमा मिळणार असून पीक कापणी प्रयोग करतांना गावातील किमान दहा वीस शेतकऱ्यांच्या उपस्थितीत हे प्रयोग राबविण्यात आले पाहिजेत मात्र बहुतांश ठिकाणी असे होतांना दिसून येत नसल्याने शेतकऱ्यांनी व राजकीय पुढाऱ्यांनी सुद्धा अशा शेतकरी विरोधी व पीक विमा कंपन्यांना फायदा करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर खोटे कापणी प्रयोग केले म्हणून कायदेशीर मार्गाने कार्यवाही करण्यासाठी एकजुटीने पुढे आले पाहिजे.

आता ऑक्टोबर महिना सुरू होतोय अजून पुढील वर्षीच्या पावसाळ्याला सुरुवात होण्यासाठी दहा महिने बाकी आहेत या दहा महिन्यात परिवाराचे पालन पोषण कसे करावे हा प्रश्न जिल्ह्यातील सर्वच शेतकर्यांसमोर उभा राहला आहे,तसेच शेतमजुरांच्या हाताला काम नसल्याने त्याची सुद्धा परिस्थिती बिकट झाली आहे,मात्र अशा भीषण परिस्थितीत सरकारने त्वरित दुष्काळी अनुदान,पीक विमा,रो ह यो ची कामं व भविष्यातील चारा ,पाणी या बाबत अति संवेदनशीलपणे उपाययोजना करून शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे महत्वाचे आहे.

तसेच यावर्षी सोयाबीन चे उत्पादन अकोला जिल्ह्यासह पातूर तालुक्यात हे बऱ्याच ठिकाणी अक्षरशः शून्य असल्याने कोणतेही पंचनामे न करता सरसकट दुष्काळी अनुदान व पूर्ण पीक विमा त्वरित शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा अन्यथा जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटना प्रशासना विरोधात रस्त्यावर उतरल्याशियाव राहणार नाहीत याची शासनाने नोंद घ्यावी.सुरू ऑक्टोबर महिन्यातच गुरांचा चारा, पिण्याचे पाणी याचा प्रश्न बिकट झाला आहे,तसेच शेतकऱ्यांचे वर्षभराचे पीक गेल्याने तात्काळ , दुष्काळी मदत, पूर्ण पीक विमा,त्वरित देण्यात यावा व सरकारने भविष्यात पाणी टंचाई निर्माण होऊ नये म्हणून मागेल त्याला विहीरी,शेततळे,नदी,नाले खोलीकरण योजना प्रभावीपणे राबवावी व शेतकरी, शेतमजुरांच्या पाठीशी उभे राहून अति तप्परतेने सर्व कामे याच महिन्यात सुरू करावीत.



# रब्बी हंगामावरही 'अल निनो'चा परिणाम!

जागतिक हवामान बदलांचा सर्वाधिक फटका भारतीय शेतीला बसत आहे. यामध्ये 'अल निनो' (El Niño) या हवामान घटकाचा प्रभाव अत्यंत महत्त्वाचा ठरतो. प्रामुख्याने मान्सूनवर किंवा खरीप हंगामावर अल निनोचा नकारात्मक परिणाम होतो असा सर्वसाधारण समज आहे; परंतु याचा थेट आणि अप्रत्यक्ष प्रभाव रब्बी हंगामावरही (हिवाळी पिके) तितकाच गंभीर होतो.

**१. अल निनो म्हणजे काय?**

अल निनो ही प्रशांत महासागराच्या (Pacific Ocean) विषुववृत्तीय भागातील पाण्याचे तापमान सामान्यपेक्षा जास्त वाढण्याची एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. यामुळे जागतिक हवामान चक्रात मोठा बदल होतो. भारतात यामुळे पावसाचे प्रमाण घटते, तापमान वाढते आणि दुष्काळी परिस्थिती निर्माण होते.

**२. रब्बी हंगामावरील अल निनोचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रभाव**

रब्बी हंगामातील पिकांची (उदा. गवत, गहू, हरभरा, मोहरी, ज्वारी, करडई) पेरणी मान्सूनच्या शेवटी जमिनीत असलेल्या ओल्यावर आणि जलाशयांमधील उपलब्ध पाण्यावर अवलंबून असते.

अल निनोमुळे रब्बी पिकांवर खालीलप्रमाणे परिणाम दिसून येतात:

जमिनीतील ओलावा आणि जलाशयातील पाणीसाठा कमी: अल निनो वर्षात मान्सूनचा पाऊस कमी किंवा अनियमित पडतो. यामुळे मान्सून संपताना जमिनीत असणारा ओलावा (Soil Moisture) कमी असतो. तसेच धरणे, विहिरी आणि कूपनलिकांमधील पाणी पातळी खालावते. परिणामी, रब्बी पिकांच्या पेरणीच्या क्षेत्रात घट होते.

**हिवाळ्यात वाढते तापमान:**

अल निनोमुळे हिवाळ्यातील कडाक्याची थंडी कमी होते आणि सरासरी तापमान नेहमीपेक्षा जास्त राहते. गहू आणि हरभरा यांसारख्या पिकांच्या उत्तम वाढीसाठी आणि दाणे भरण्यासाठी थंडीची (कमी तापमानाची) अत्यंत गरज असते. तापमान वाढल्यास गव्हाचा परिपक्वता कालावधी कमी होतो आणि दाणे बारीक राहतात, ज्यामुळे उत्पादनात १५ ते २० टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते.

**अनियमित परतीचा पाऊस आणि अवकाळी पाऊस:**

अल निनोच्या प्रभावामुळे ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणारा परतीचा पाऊस लांबतो किंवा पूर्णपणे गायब होतो. तसेच मध्य हिवाळ्यात अचानक हवामान बदलून अवकाळी पाऊस किंवा गारपीट होण्याचा धोका वाढतो.

**कीड व रोगांचा वाढता प्रादुर्भाव:**

हिवाळ्यात नेहमीपेक्षा जास्त तापमान आणि दमट हवामान राहिल्यास पिकांवर कीड आणि रोगांचा (उदा. हरभऱ्यावरील घाटी आळी, गव्हावरील तांबेरा) प्रादुर्भाव वेगाने वाढतो.

**३. मुख्य रब्बी पिकांवर होणारा परिणाम**

पिक अल निनोचा मुख्य परिणाम गहू थंडी कमी पडल्यास दाणे पूर्ण भरत नाहीत; उत्पादनात मोठी घट होते. हरभरा ओल अभावी पेरणीला उशीर; उष्णतेमुळे फुले व आळ्या गळण्याचे प्रमाण वाढते. मोहरी / तेलबिया तापमानातील चढ-उतारामुळे कीड-रोगांचा प्रादुर्भाव वाढतो.

रब्बी ज्वारी जमिनीतील पाणी कमी पडल्यास ताटांची वाढ खुंटते व तुरा नीट बाहेर पडत नाही. ४. अल निनोच्या संकटावर शेतकऱ्यांसाठी उपाययोजना

अल निनोच्या प्रभावातून रब्बी पिकांचे रक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी हवामानाधारित आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे:

संरक्षित सिंचन पद्धती: ठिबक (Drip) आणि तुषार (Sprinkler) सिंचनाचा वापर करून उपलब्ध पाण्याचा सूक्ष्म वापर करावा.

कमी पाण्यावर येणाऱ्या जातींची निवड: कोरडवाहू व उष्णतेला सहनशील असणाऱ्या पिकांच्या सुधारित वाणांची (उदा. गव्हाचे आणि हरभऱ्याचे दुष्काळरोधक वाण) पेरणी करावी. मल्चिंग (आच्छादन): जमिनीत ओलावा टिकवून ठेवण्यासाठी पिकांच्या ओळींमध्ये सेंद्रिय आच्छादन किंवा प्लास्टिक मल्चिंगचा वापर करावा.

पेरणीच्या वेळेत बदल: हवामान अंदाजानुसार पेरणीची वेळ थोडी पुढे-मागे करून पिकाला योग्य थंडी मिळेल असे नियोजन करावे.

सेंद्रिय आणि जिवाणू खतांचा वापर: जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढवण्यासाठी शेणखत, कंपोस्ट आणि जिवाणू संवर्धकांचा वापर वाढवावा.

अल निनो हे रब्बी हंगामासाठी एक मोठे आव्हान असले, तरी योग्य पूर्वतयारी, पाण्याचे नियोजन आणि हवामानानुकूल शेती पद्धतींचा अवलंब केल्यास या आव्हानावर मात करणे शक्य आहे. शासनानेही अशा काळात शेतकऱ्यांना पाण्याचे योग्य नियोजन, बियाणे उपलब्धता आणि पीक विम्याच्या माध्यमातून वेळेत पाठबळ देणे अत्यंत गरजेचे आहे.

# आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन

दरवर्षी १ ऑक्टोबर हा दिवस जगभरात 'आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन' (International Day of Older Persons) म्हणून साजरा केला जातो. समाजात ज्येष्ठांचे योगदान अधोरेखित करणे, त्यांच्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्या सन्मानाचे व हक्कांचे रक्षण करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन पार्श्वभूमी आणि इतिहास

संयुक्त राष्ट्र महासभेने (UN General Assembly) १४ डिसेंबर १९९० रोजी ठराव ४५/१०६ मंजूर करून १ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय वृद्ध व्यक्ती दिन म्हणून घोषित केला. १ ऑक्टोबर १९९१ रोजी हा दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला. वाढत्या वयोमानासोबत येणाऱ्या आव्हानांवर मात करण्यासाठी आणि जगभरात ज्येष्ठांसाठी अनुकूल वातावरण तयार करण्यासाठी संयुक्त राष्ट्रांनी पुढाकार घेतला.

उद्देश आणि महत्त्व

योगादानाचा सन्मान: ज्येष्ठांनी त्यांच्या आयुष्यात कुटुंब, समाज आणि राष्ट्रासाठी दिलेल्या योगदानाचा आदर करणे.

हक्कांचे संरक्षण: वृद्धांना सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवून देणे आणि त्यांच्यावरील अत्याचारांना आळा घालणे.

आरोग्य आणि देखभाल: वाढत्या वयानुसार लागणाऱ्या आरोग्य सुविधा, मानसिक आधार आणि निगा यांवर लक्ष केंद्रित करणे.

अनुभवाचा उपयोग: ज्येष्ठांचे ज्ञान, अनुभव आणि कौशल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे.

आजच्या काळातील प्रमुख आव्हाने

आजच्या आधुनिक आणि गतिमान युगात ज्येष्ठांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो:

एकाकीपणा आणि दुर्लक्ष: विभक्त कुटुंब पद्धतीमुळे अनेक वृद्ध व्यक्तींना एकाकीपणाचा सामना करावा लागतो.

आरोग्य समस्या: वाढत्या वयासोबत येणारे आजार (उदा. अल्झायमर, डिमेंशिया, संधिवात, हृदयविकार) आणि महागड्या वैद्यकीय उपचारांचा खर्च.

आर्थिक असुरक्षितता: निवृत्तीनंतरचे उत्पन्नाचे साधन नसणे किंवा पुरेशी पेन्शन न मिळणे.

डिजिटल दरी, बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेताना येणाऱ्या अडचणी.

सामाजिक जबाबदारी आणि उपाय

ज्येष्ठांचे जीवन सुकर आणि आनंददायी बनवण्यासाठी प्रत्येक घटकाने पुढे येणे गरजेचे आहे:

कुटुंबाचा आधार: घरातील ज्येष्ठांशी रोज संवाद साधणे, त्यांच्या अनुभवांचा आदर करणे आणि त्यांना निर्णय प्रक्रियेत समाविष्ट करणे.

शासकीय योजना: वृद्धांसाठी आरोग्य विमा, पेन्शन योजना, आणि सार्वजनिक वाहतुकीत सवलती यांसारख्या सुविधांची प्रभावी अंमलबजावणी.

समुदाय आणि संस्था: ज्येष्ठ नागरिक संघांच्या माध्यमातून सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करणे.

वृद्धत्व हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एक नैसर्गिक टप्पा आहे. ज्येष्ठांचा सांभाळ करणे ही केवळ एक जबाबदारी नसून, त्यांच्या अनुभवांचा आणि त्यागाने समृद्ध झालेल्या वारशाचा सन्मान करणे आहे.





# पाणी टंचाईशी दोन हात करण्याचे आव्हान!

'पाणी हेच जीवन' असे आपण वारंवार म्हणतो, परंतु उन्हाळा जवळ आला किंवा पावसाने ओढ दिली की याच 'जीवना'साठी दाहीदिशा भटकंती करण्याची वेळ आपल्यावर येते. आज पाणी टंचाई ही केवळ एका ऋतूपुरती मर्यादित समस्या राहिलेली नसून, ते एक गंभीर सामाजिक, आर्थिक आणि नैसर्गिक संकट बनले आहे. वाढते नागरिकरण, हवामान बदल आणि पाण्याचा बेसुमार वापर यामुळे हे आव्हान दिवसेंदिवस अधिक बिकट होत चालले आहे.

पाणी टंचाईची प्रमुख कारणे

१. हवामानातील अनिश्चितता: अनियमित पाऊस, ऐनवेळी येणारा दुष्काळ आणि वाढते तापमान यामुळे नैसर्गिक पाण्याचे स्रोत झपाट्याने आटत आहेत.

२. भूजलाचा अतिवापर: बोरवेल आणि विहिरींच्या माध्यमातून भूजलाचा अमर्याद उपसा केल्यामुळे भूजल पातळी चिंताजनक पातळीपर्यंत खाली गेली आहे.

३. पाण्याचा अपव्यय: नळ उघडे ठेवणे, वाहने धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करणे आणि गळतीकडे दुर्लक्ष करणे यांसारख्या सवयींमुळे मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जाते.

४. जंगलतोड: झाडांची संख्या घटल्यामुळे जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता कमी झाली आहे.

पाणी टंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक उपाय

पाणी टंचाईशी दोन हात करायचे असतील, तर केवळ प्रशासनावर अवलंबून न राहता प्रत्येक नागरिकाला यात योगदान द्यावे लागेल:

रेन वॉटर हार्वेस्टिंग (रेन वॉटर संकलन): पावसाचे पाणी छतावरून वाहून जाऊ न देता ते जमिनीत मुरवणे किंवा साठवणे हा सर्वात प्रभावी उपाय आहे. प्रत्येक इमारतीसाठी हे अनिवार्य केले पाहिजे.

पाण्याचा पुनर्वापर: स्वयंपाकघरातील किंवा कपडे धुतलेले पाणी झाडांना देणे अथवा स्वच्छतेसाठी वापरणे यांसारख्या सवयी आत्मसात केल्या पाहिजेत.

शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर: शेती क्षेत्रात मोकळे पाणी सोडण्याऐवजी 'ठिबक सिंचन' (Drip Irrigation) आणि 'तुषार सिंचन' (Sprinkler Irrigation) पद्धतीचा वापर वाढवणे गरजेचे आहे.

वृक्षारोपण आणि जलसंधारण: 'झाडे लावा, झाडे जगवा' हा नारा केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष अंमलात आणणे आणि बंधारे, शेततळी यांद्वारे पाणी अडवून जमिनीत जिरवणे आवश्यक आहे.

निष्कर्ष

पाणी टंचाई हे एक असे आव्हान आहे, ज्याचा सामना आपण आजच केला नाही, तर उद्याचे भविष्य अंधकारमय असेल. "पाणी अडवा, पाणी जिरवा" आणि "पाणी वाचवा" या घोषणा केवळ भिंतींवर न लिहिता आपल्या दैनंदिन जीवनशैलीचा भाग बनवल्या पाहिजेत. पाण्याचा प्रत्येक थेंब मौल्यवान आहे; तो वाचवणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे.

# सामाजिक बांधिलकीचे 'गजानन' दर्शन आणि मदतीचे व्यापक आव्हान

'अल निनो'च्या धक्क्याने यंदा राज्यावर कोरड्या दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. पावसाने दिलेल्या ओढीमुळे शिवारं सुकली आहेत, विहिरींनी तळ गाठला आहे आणि देशाचा पोशिंदा असलेला शेतकरी अन् शेतमजूर पुन्हा एकदा संकटाच्या चक्रव्यूहात सापडला आहे. निसर्गाच्या या अवकृपेमुळे निर्माण झालेल्या भीषण परिस्थितीत बळीराजाला आधाराची प्रचंड गरज आहे. अशा अत्यंत कठीण प्रसंगी शेगावच्या श्री गजानन महाराज संस्थानने मुख्यमंत्री सहाय्यता निधीस १ कोटी ११ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द करत पुन्हा एकदा आपल्या उदात्त परंपरेची साक्ष दिली आहे. श्री गजानन महाराज संस्थान हे केवळ श्रद्धेचे केंद्र नसून सामाजिक संवेदनशीलतेचा एक आदर्श वस्तुपाठ आहे. कोविडचे संकट असो, महापूर असो वा दुष्काळ, हे संस्थान नेहमीच जनसेवेसाठी तत्पर राहिले आहे. धार्मिक संस्थांनी केवळ अध्यात्मापुरते मर्यादित न राहता समाजाच्या दुःखात धावून कसे जावे, याचे जिवंत उदाहरण शेगाव संस्थानने घालून दिले आहे. १ कोटी ११ लाखांची ही मदत केवळ एक रक्कम नसून संकटात सापडलेल्या बळीराजाच्या पाठीशी उभे राहण्याचा एक खंबीर संदेश आहे.

मात्र, दुष्काळाचे हे संकट इतके प्रचंड आहे की, केवळ एका किंवा काही मोजक्या संस्थांच्या मदतीने ते पूर्णपणे निवारणे शक्य नाही. आज राज्याला आणि देशाला पोसणारा शेतकरी स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करत असताना समाजातील सर्वच घटकांनी पुढे येण्याची तातडीची गरज आहे.

कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी च्या माध्यमातून आणि वैयक्तिक पातळीवर निधी उभारून थेट दुष्काळग्रस्त भागातील पाण्याचे नियोजन, चारा छावण्यांची उभारणी, आणि शेतकऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाचा खर्च यांसारख्या आघाड्यांवर ठोस मदत पोहोचवणे आवश्यक आहे. अन्नदाता संकटात असताना त्याला एकटे सोडणे ही राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने मोठी हानी ठरेल. २०२६ च्या या भीषण दुष्काळी परिस्थितीत शेगाव संस्थानने दाखवलेल्या वाटेवरून चालत जर देशातील बळीराजाला आपण सर्व मिळून बळ दिले, तरच तो पुन्हा उभारी घेऊ शकेल. हा मदतीचा हात केवळ भूतदया नाही, तर देशाच्या आर्थिक आणि सामाजिक पायाला भक्कम ठेवण्यासाठीचे आपले परमकर्तव्य आहे.

प्रा. प्रज्ञानंद थोरात
मो. 9822674487

# श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात

प्रतिनिधी १ ऑक्टोबर



**अकोट :** आकोट स्थानिक श्री क्षेत्र श्रद्धासागर येथे श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न झाली. सर्व स्तरातील भाविक भक्त, आजीवन सभासद, दानशूर दात्यांचा विश्वास संपादन करीत श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोट प.ट्र.र.नं.ई ४४८ या संस्थेने संपूर्ण राज्यामध्ये वारकरी सांप्रदायिक स्तरावर त्याचप्रमाणे सामाजिक, सांस्कृतिक, आध्यात्मिक, लोकोपयोगी, लोकहितैषी सेवा उपक्रमांमध्ये फार मोठा लौकिक प्राप्त केला आहे. तसेच, स्वानंद सुखनिवासी सद्गुरू श्री जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री क्षेत्र आळंदीची उपशाखा "श्री संत वासुदेव महाराज वारकरी शिक्षण संस्था, श्री क्षेत्र श्रद्धा सागर, आकोट" सुरू झाल्याने संपूर्ण विदर्भवासियांना ही फार मोठी पर्वणी लाभली आहे. यासोबतच श्री संस्थेद्वारा वार्षिक, पाक्षिक, साप्ताहिक, दैनंदिन कार्यक्रम व सेवा उपक्रम नियमितपणे सुरू आहेत. संस्थेच्या दिवसेंदिवस वाढत्या उत्कर्षाचे सर्व श्रेय संस्थेचे आजिवन सभासद, सेवाधारी व भक्त मंडळी, विश्वस्त मंडळी यांना असल्याचे कृतज्ञतापूर्ण उद्गार संस्थाध्यक्ष श्री.ह.भ.प. वासुदेवराव महाराज महल्ले यांनी व्यक्त केले. श्री क्षेत्र श्रध्दासागर, आकोट येथे पार पडलेल्या संस्थेच्या २५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्ष पदावरुन ते बोलत होते.सर्वप्रथम संस्थेचे आराध्य दैवत सद्गुरु श्री संत वासुदेव महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन, दीप प्रज्वलन, प्रार्थना होवून वार्षिक सर्वसाधारण सभेला सुरुवात झाली. संस्थेचे दिवंगत आजीवन सभासद तसेच सेवाधारी, भक्तगणांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. गतवर्षामध्ये संस्थेने केलेली प्रगती, संस्थेच्या कामकाजाचा व उत्कर्षाचा चढता आलेख सादर करतांना संस्थाध्यक्ष ह भ प. वासुदेव महल्ले महाराज म्हणाले की, गत अहवाल वर्षात संस्थेद्वारा विविध धार्मिक, सामाजिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, आरोग्य, शेतीविषयक सेवा कार्यक्रम उत्स्फुर्त प्रतिसादाने पार पडले. या करिता सर्व भक्तगण, सेवाधारी, हितचिंतक यांची सेवा उल्लेखनिय आहे. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय सुचीनुसार सभेत चर्चा पार पडली. संस्थेची वार्षिक हिशेब पत्रके, ताळेबंद, पुढील आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक, अंकेक्षण अहवाल सादर करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व सदस्यांनी एकमताने मंजुरी प्रदान केली. श्री संस्थेला भरीव आर्थिक योगदान दिल्याबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुंडकर यांचा तसेच पालखी मार्गाने वृक्षारोपण तथा फिरत्या पाणेरीचा आगळावेगळा उपक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल श्री संस्थेचे निमंत्रित सदस्य अनिल कोरपे व बापजी शिंदे यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

संस्थेचे आजिवन सभासद दिनकर गायगोले, राजेश कुलट, बाळकृष्ण आमले, नंदकिशोर हिंगणकर, बाळासाहेब फोकमारे, प्रवीण भगत यांनी आपले मनोगत व्यक्त करुन संस्थेच्या कार्याविषयी समाधान व्यक्त करीत कार्यगौरव केला. या वार्षिक सर्वसाधारण सभेला विश्वस्त मंडळाचे बाबाराव बिहाडे, महादेव ठाकरे, पुरुषोत्तम लाजूरकर, रविंद्र वानखडे, मोहन जायले पाटील, अविनाश गावंडे, डॉ. अशोक बिहाडे, सुनंदाताई आमले, जयदिप सोनखासकर, गजानन चोपडे, अशोक पाचडे, नंदकिशोर हिंगणकर, पुरुषोत्तम मोहोकार, ॲड. शिरीष ढवळे, दिलीप हरणे, अनिल कोरपे, गजानन दुधाट, केशवप्रसाद राठी यांच्यासह संस्थेचे आजीवन सभासद उपस्थित होते.रविंद्र वानखडे यांनी तर आभार प्रदर्शन संस्थेचे विश्वस्त जयदिप सोनखासकर यांनी केले.

# शिर्ला येथील कृषिकन्यांची कृषी उत्पन्न बाजार समिती, पातूर येथे शैक्षणिक भेट




प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**पातूर:** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला संलग्न श्रीमती सुमित्राबाई अंधारे कृषी महाविद्यालय, शिर्ला येथील ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत कृषिकन्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, पातूर येथे शैक्षणिक भेट दिली.

या भेटीदरम्यान कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती विद्यार्थिनींना देण्यात आली. शेतकऱ्यांकडून येणाऱ्या कृषी मालाची नोंदणी, प्रतवारी (ग्रेडिंग), वजन प्रक्रिया, लिलाव प्रणाली, बाजारभाव निश्चिती, व्यापाऱ्यांची भूमिका तसेच शेतकऱ्यांना मिळणाऱ्या विविध सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.

यावेळी बाजार समितीच्या अधिकाऱ्यांनी कृषी विपणन व्यवस्थेचे महत्त्व, शेतमाल विक्रीची वैज्ञानिक पद्धत, ई-नाम (e-NAM) प्रणालीची माहिती तसेच शेतकऱ्यांना पारदर्शक व्यवहारातून योग्य दर कसा मिळतो याबाबत मार्गदर्शन केले. विद्यार्थिनींनी विविध विभागांना भेट देऊन प्रत्यक्ष कामकाजाचे निरीक्षण केले व अधिकाऱ्यांशी संवाद साधून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थिनींना कृषी विपणन व्यवस्थेची प्रत्यक्ष माहिती मिळाली तसेच भविष्यात शेतकऱ्यांना बाजार व्यवस्थेबाबत योग्य मार्गदर्शन करण्यासाठी आवश्यक ज्ञान प्राप्त झाले.

या कार्यक्रमासाठी अर्थशास्त्र विभागाचे प्रा. शिवकुमार राठोड सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच प्रा. डॉ. राम खर्डे यांचेही मार्गदर्शन लाभले.

या शैक्षणिक भेटीत प्रगती पोहरे, प्रियंका गवळे, प्रिया लुदरकर, साक्षी मुंढे,प्रमिता अंभोरे व खुशी राखोंडे यांनी सक्रिय सहभाग नोंदविला.

# लोक संचालित साधन केंद्र व समृद्धी कृषी प्रक्रिया संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रतिनिधी १ ऑक्टोबर



**अकोला :** महिला आर्थिक विकास महामंडळ द्वारा संचालित लोकसंचालित साधन केंद्र बार्शीटाकळी व समृद्धी कृषी प्रक्रिया सहकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा 30 सप्टेंबर 2026 रोजी फिरदौस मंगल कार्यालयात झाली.

सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष शालिनीताई सावरकर सीएमआरसी अध्यक्ष होत्या. उदघाटक एफपीओ अध्यक्ष रुख्मिणी सोनोने तर प्रमुख उपस्थिती विनोद बोरकर मुख्य अधिकारी नगर पंचायत बार्शीटाकळी, संध्या कर्वे तालुका कृषी अधिकारी हे होते.

प्रमुख मार्गदर्शक वर्षा खोब्रागडे जिल्हा समन्वय अधिकारी माविम, लाडुरकर जिल्हा संरक्षण अधिकारी महिला बाल विकास कक्ष अकोला, एचडीएफसी बँक पातूरचे व्यवस्थापक उमेश कारे, एकल महिला जिल्हा समितीचे किरण हिवराडे उपस्थित होते. कार्यक्रमात 25 गावातील बचत गटातील 450 महिला व शेतकरी महिला उपस्थित होत्या.

महिला शेतकरी नोंदणी करिता डेमो देऊन नोंदणी करण्यात आले. उत्कृष्ट व्हीओ, उत्कृष्ट उद्योजक, जास्तीत जास्त कर्ज रक्कम प्राप्त गट, पंच सूत्रीमध्ये असलेले गट, उत्कृष्ट आरजीबी, उत्कृष्ट एफपीओ बॉडी मेंबर यांना प्रमाणपत्र व सन्मान चिन्ह देऊन सम्मानित करण्यात आले.

एफपीओचे कार्य अहवाल वाचन मॅनेजर अमित पतींगे यांनी तर सीएमआरसीचे अहवाल वाचन मॅनेजर नहेल शेख यांनी केले. ऑडिट सादरीकरण लेखापाल मोहन ताजने, किशोर म्हैसने यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी सीएमआरसी अध्यक्ष चंदाताई भवाने,प्रियाताई जाधव, उजवला इंगळे, मालता चक्रे, भारसाकळे, पूजा गालट, शीतल राठोड, शिल्पा भातकडे, देवकन्या भवाने, शारदा भगत, छाया सावडे, पूजा बावसकर आदी उपस्थित होते. कार्यक्रमचे आभार प्रदर्शन एलडीसी विशाल सोनोने यांनी केले.

# स्वच्छता दूतांचा सत्कार; शहर स्वच्छ ठेवणाऱ्या हातांना मिळाली कौतुकाची थाप

प्रतिनिधी १ ऑक्टोबर




**मूर्तिजापूर:** शहराची स्वच्छता राखत नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या सफाई कामगारांचा हर्षल दादा अग्रवाल मित्र परिवाराच्या वतीने जुनी वस्ती येथील हनुमान मंदिर परिसरात शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यात स्वच्छता दूतांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून, दररोज नागरिकांच्या आरोग्यासाठी ते जबाबदारीने काम करतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचा सन्मान करणे हे समाजाचेही कर्तव्य आहे, असे ॲड. हर्षद अग्रवाल यांनी सांगितले.

कार्यक्रमाला व्यासपीठावर आरोग्य निरीक्षक नरसिंग चावरे, आरोग्य निरीक्षक विजय लकडे, आरोग्य सभापती रवी माडकर, आयोजक ॲड. हर्षद करुणा सतीश अग्रवाल व शालिग्राम यादव उपस्थित होते.

यावेळी राम कामवाल, श्याम कामवाल, हरिदास धामणे, धीरज गांगाडिया, राम लोखंडे, गणेश वाटोळे, चेतन मिलांदे, संतोष कामवाल, बंटी धान्य, मुकेश पिवाल, नारायण पिवाल, गौरव मिलांदे, सुरज मिलांदे, सोनू राजपूत, आकाश मिलांदे, अजय मिलांदे, शशिकांत हाडाले, विजय मिलांदे, कमल राजपूत, विकी कामवाल, प्रथम पिवाल, शेख अब्बास, शिवा टाक, रुपेश भोयेत, संतोष खंडारे, अभिनय मुळे, लिलेश मुळे, बाळा तिवारी, रोहित श्रीनाथ, आकाश भगत, श्रीकांत सरोदे, पवन खांडेकर, सार्थक शहाळे यांच्यासह मोठ्या संख्येने सफाई कामगार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार अन्वर खान यांनी केले.

# छत्रपती संभाजीराजे यांच्या उपस्थितीत आसूड मोर्चा 5 ऑक्टोबरला तेल्हाऱ्यात धडकणार

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**तेल्हारा :** आस्मानी संकटांनी होरपळलेला शेतकरी आणि उपाशी पोटी राबणारा शेतमजूर आज अन्यायाच्या आगीत जळत आहे. मायबाप सरकार मात्र एसी केबिनमध्ये बसून या सर्वस्व गमावलेल्या बळीराजाची क्रूर थट्टा करत आहे. या झोपलेल्या आणि असंवेदनशील सरकारच्या कानठळ्या बसवण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या हक्काचा जाब विचारण्यासाठी अडगाव बु. येथे स्वराज्य पक्षाचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत डिक्कर यांच्या प्रमुख उपस्थितीत 'आसूड मोर्चा'ची वज्रमूठ बांधण्यात आली. येत्या ५ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीराजे यांच्या प्रमुख उपस्थित टावर चौक ते तहसील कार्यालय तेल्हारा दरम्यान निघणारा हा 'आसूड मोर्चा' केवळ एक आंदोलन नसेल, तर तो सरकारच्या शोषणाविरुद्ध बळीराजाचा पेटलेला आक्रोश असेल.

हेक्टरी १ लाख रुपयांची दुष्काळी मदत असो, की भूमिहीन मजुरांच्या चुली पेटवण्यासाठी ५० हजारांचे अर्थसहाय्य, थकलेला पीक विमा असो, की केळी व चक्रीवादळाची रोखलेली भरपाई-सरकारने प्रत्येक आघाडीवर शेतकऱ्यांचा विश्वासघात केला आहे. बोगस बियाणे विकणाऱ्या व्यापाऱ्यांना पाठीशी घालणारे हे शासन शेतकऱ्यांना विनाअट कर्जमुक्ती देण्यास टाळाटाळ करत आहे. तेल्हारा तालुक्यातील जनतेला क्षारयुक्त पाणी पाजून आरोग्य धोक्यात घालणाऱ्या या निष्क्रिय प्रशासनाविरुद्ध आता आरपारची लढाई पेटली आहे. हक्क हिरावून घेणाऱ्या या सरकारला झुकवण्यासाठी प्रत्येक शेतकरी आणि शेतमजुराने या संघर्षात पूर्ण ताकदीने उतरावे असे आवाहन प्रशांत डिक्कर यांनी बैठकीत बोलताना केले. कार्यक्रमाचे समारोपीय भाषण शेतकरी नेते लक्ष्मीकांत कौठकार यांनी केले. सुत्रसंचालन अनिल मानकर यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिजित ढगे, विवेक ढोकणे, राजू रोहनकार, ऋषी तराळे, अभिषेक डिक्कर यांनी अथक परिश्रम घेतले.

# पटेल हत्या प्रकरणात चार आरोपी फरार घोषित; तिघांच्या मालमत्ता जप्तीचा आदेश

वि. प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोट :** काँग्रेस नेते हिदायत पटेल हत्या प्रकरणातील चार आरोपींना अकोट येथील प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालयाने फरार घोषित केले असून त्यांना ३० दिवसांच्या आत न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. तसेच मोहम्मद बद्रुजमा मोहम्मद आदिल, संजय रामदास बोडखे आणि फजीलखा आसिफखा पटेल यांच्या मालमत्ता जप्तीचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत.

हिदायत पटेल यांच्यावर ६ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या प्राणघातक हल्ल्यानंतर उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला होता. प्रकरणातील आरोपींविरुद्ध यापूर्वी अजामीनपात्र वॉरंट काढण्यात आले होते. मात्र, आरोपी न्यायालयात हजर न राहिल्याने न्यायालयाने ही कारवाई केली आहे. आरोपींची कोठडीत चौकशी आवश्यक असल्याचेही न्यायालयाने नमूद केले आहे.

# आईसाहेब खेंडकर स्मृती दिन खेंडकर ज्ञानगंगा साजरा

प्रतिनिधी १ ऑक्टोबर



**अकोला:** १ ऑक्टोबर स्व. सौ. आईसाहेब उपाख्य मायाताई खेंडकर यांचा स्मृती दिन, सरस्वती नगर, जुना वाशीम नाका, बायपास येथील विष्णुपंत खेंडकर माध्यमीक विद्यालय, स्व. यमुनाबाई खेंडकर मराठी प्रा. शाळा व स्व. नारायणराव खेंडकर कॉन्व्हेट येथे संपन्न झाला.

हा कार्यक्रम विविध कार्यक्रमातुन विद्यार्थ्यांच्या समवेत साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते स्व. आईसाहेब खेंडकर यांच्या पावन स्मृर्तीस अभिवादन करण्यात आले. तर कार्यक्रमाचे उद्घाटक अकोला महानगरपालिका उपायुक्त दिलीप जाधव, अध्यक्ष म्हणून माध्यमीक विद्यालयाचे मुख्याध्यापक निलेश खेंडकर, तर प्रमुख पाहुणे म्हणून अकोला महानगरपालिका नगर सचिव अनिल बिडवे तसेच प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अल्केश खेंडकर यांची प्राथमिक उपस्थिती होती. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक यांनी आपल्या भाषणातून वेळेचा सदुपयोग घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून आपली प्रगती करत रहावी, असे प्रतिपादन केले.

यावर्षी स्मृतिदिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये कॉन्व्हेंट विभागात बडबड गीत व रंगभरण स्पर्धा तर वर्ग पहिली व चौथा वर्गासाठी कविता गायन व रंगभरण स्पर्धा तसेच वर्ग पाचवी ते दहावी साठी निबंध स्पर्धा आणि सुंदर हस्ताक्षर स्पर्धा अशा विषयावर घेण्यात आल्या. यामध्ये शालेय विद्यार्थ्यांनी भरगच्च असा आपला सहभाग नोंदविला आणि मान्यवरांच्या हस्ते प्रावीण्य प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांनी दर वर्षीप्रमाणे याही वर्षी शाळेला स्नेह भेट दिली.

कार्यक्रमाचे संचालन उषा उबाळे यांनी केले. तर आभार अल्केश खेंडकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्या साठी शाळेतील शिक्षक आशा हिवरकर, कांचन वानखडे, सुरेश सुरत्ने, प्रज्ञानंद थोरात, श्रीकांत पागृत, गोपाल वानखडे, प्रशांत काळे, छाया इंगळे, अंजु मुंडे, रूपाली उन्हाळे, वर्षा मते, माया खोडके, प्रणाली धोटे, मेघा इंगळे, शुभांगी दामोदर, अनिता वानखडे, भाग्यश्री भामद्रे यांच्यसह पालक उपस्थित होते.

# हिवरखेड पोलीस स्टेशनच्या वतीने लाडक्या बाप्पाला निरोप

प्रतिनिधी १ ऑक्टोबर



**हिवरखेड:** हिवरखेड पोलीस स्टेशनच्या वतीने स्थापन करण्यात आलेल्या लाडक्या गणरायाला मोठ्या भक्तिभावात आणि पारंपारिक पद्धतीने निरोप देण्यात आला.

गणेशोत्सव काळात हिवरखेड सह आजूबाजूच्या सर्व खेडे-पाड्यातील गणेश मंडळांना विसर्जन मिरवणुकीसाठी पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात केला होता. सर्व गणेश मंडळांच्या मिरवणुका शांततेत आणि कुठलाही अनुचित प्रकार न घडता पार पडल्यानंतर, शेवटी आपल्या पोलीस स्टेशनच्या बाप्पाला निरोप देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

यावेळी पोलीस स्टेशन आवारात महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. त्यानंतर पारंपारिक बँड पार्टीच्या तालावर वाजत-गाजत, ढोल-ताशांच्या गजरात पोलिसांनी स्वतः ठेका धरत गुलालाची उधळण करत गणरायाला निरोप दिला. पोलीस कर्मचारी बँडच्या तालावर थिरकल्याचे मनोहारी दृश्य यावेळी पाहायला मिळाले.

पोलीस स्टेशनचा बाप्पा हा सर्वांसाठी श्रद्धेचा विषय असून, शांततेत उत्सव पार पडल्याबद्दल पोलिसांनी गणरायाचे आभार मानत पुढच्या वर्षी लवकर या असे म्हणत निरोप दिला. यावेळी ठाणेदार ,पोलिस कर्मचारी, गृहरक्षक उपस्थित होते.

# सेंट पॉल्स अकॅडमीत 'ग्रँड पेरेंट्स डे' उत्साहात साजरा

वि. प्रतिनिधी १ ऑक्टोबर




**अकोट :** येथील श्रीजी कॉलनीस्थित सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये मंगळवार, दि. 29 सप्टेंबर रोजी 'ग्रँड पेरेंट्स डे' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आजी-आजोबांविषयीचा आदर, प्रेम आणि त्यांच्या संस्कारांचे महत्त्व प्रभावीपणे व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया होते. यावेळी लूणकरण डागा, प्रमोद चांडक, शारद लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया, मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, रिंकू अग्रवाल, पालक प्रतिनिधी शेषराव अंभोरे, सुरेखा अंभोरे, लता राठोड, गजानन राठोड तसेच नितीन गावंडे, मालती महल्ले, सुचिता गायकवाड आणि वैशाली गावत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमापूजन व स्वागतगीताने झाली. उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले. नर्सरी ते चौथीच्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

विशेष आकर्षण ठरलेल्या 'सर्वधर्मसमभाव' या संकल्पनेवर आधारित रॅम्प वॉकमध्ये आजी-आजोबा आणि नातवंडांनी विविध वेशभूषांमध्ये सहभाग घेतला. या उपक्रमाला विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी संस्थेचे सचिव प्रमोद चांडक यांनी ज्येष्ठ व्यक्तींचे मार्गदर्शन आणि अनुभव विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देतात, असे सांगितले. मुख्याध्यापक विजय बिहाडे यांनी वडीलधाऱ्यांचा सल्ला आणि पाठबळ हे जीवनातील मोठे बळ असल्याचे प्रतिपादन केले. रिंकू अग्रवाल, सुरेखा अंभोरे यांनीही मार्गदर्शन केले. संचालन देवांश तायडे, वीराई हुतके, मनीषा रोहनकर आणि आरती गावंडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनिता इंगळे यांनी मानले.

# शालेय विद्यार्थ्यांच्या पालकांनी सावध राहण्याची गरज

**हिवरखेड :** हिवरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या एका गावात एका शालेय विद्यार्थिनी सोबत लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पीडितेने कुटुंबीयांच्या मदतीने पोलिसात तक्रार दाखल केली असून हिवरखेड पोलिसांनी पीडित युवतीच्या जबानी वरून तक्रार नोंदवून सदर प्रकरण पुढील तपासासाठी संबंधित पोलीस स्टेशनकडे वर्ग केल्याची माहिती आहे. आरोपी विरुद्ध कलम ३७६ नुसार गुंन्हा दाखल करण्यात आला असल्याचे समजते,

या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पालक वर्गात चिंता व्यक्त होत आहे.

पालकांसाठी महत्त्वाचे आवाहन: आपली शाळकरी मुले कुठे जातात, कोणासोबत राहतात, मोबाईलवर काय पाहतात याकडे पालकांनी दररोज थोडा वेळ काढून लक्ष देणे गरजेचे आहे. शाळेच्या नावाखाली किंवा शिकवणीच्या नावाखाली मुले गैरमार्गाला तर जात नाहीत ना, याची खात्री करणे आवश्यक आहे.

## Name Change

Old Name
A. GANI A. RASHID
New Name
Abdul Gani Abdul Rashid
At Post: Borgaon Manju
Dist: Akola

# सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

गुरुवार, दि. १ ऑक्टोबर २०२६ https://epaper.citynewssuperfast.com


# लाचखोर वनपाल, वनमजूर, ऑपरेटर रंगेहाथ जाळ्यात

## महागाव येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**यवतमाळ** : लाकूड वाहतूक परवानगी (टीपी) पास देण्यासाठी चार हजार रुपयांची लाच मागून ती स्वीकारणाऱ्या महागाव येथील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयातील तीन कर्मचाऱ्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. यात एका कंत्राटी संगणक ऑपरेटरसह वनपाल आणि वनमजुराचा समावेश आहे. या कारवाईने वन विभागात मोठी खळबळ उडाली आहे.

विनोद सोळंके (कंत्राटी संगणक ऑपरेटर), आनंद बोरेकर (वनपाल), जयवंता ढगे (वनमजूर) अशी लाचखोरांची नावे आहे. तक्रारदार ६० वर्षीय शेतकरी यांचे जुने घर पडल्यामुळे त्यातील सागवान लाकूड नवीन घरकामासाठी उमरखेड येथे नेयचे होते. या लाकडाच्या वाहतूक परवानगी पाससाठी त्यांनी महागाव येथील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयात अर्ज केला होता. या कामासाठी शासकीय चलनाचे ७०० रुपये आणि वरचे ४,००० रुपये लाच म्हणून वेगळे द्यावे लागतील, पैसे दिल्याशिवाय काम होणार नाही, अशी मागणी संगणक ऑपरेटर विनोद सोळंके याने केली. तक्रारदाराने याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ येथे तक्रार दाखल केली. एसीबीच्या पथकाने २९, ३० सप्टेंबर २०२६ रोजी पंचांसमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान विनोद सोळंके (कंत्राटी संगणक ऑपरेटर), आनंद बोरेकर (वनपाल) आणि जयवंता ढगे (वनमजूर) यांनी संगनमत करून शासकीय चलना व्यतिरिक्त ४,००० रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.




### कारवाई करणारे पथक

- ही धडक कारवाई अमरावती परिक्षेत्राचे पोलिस अधीक्षक बापू बांगर, अप्पर पोलिस अधीक्षक सुनील किनागे, आणि यवतमाळ एसीबीचे पोलिस उपअधीक्षक अभय आष्टेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक मनोज ओराके, स्वप्निल निराळे, तसेच पोलिस अंमलदार जयंत ब्राम्हणकर, अतुल मते, सुधिर कांबळे, सतिश सोनोने, इफराज काझी आणि सहकाऱ्यांनी केली.

### महागाव वनपरिक्षेत्र कार्यालयात सापळा

- लाचेची मागणी सिद्ध झाल्यानंतर ३० सप्टेंबर रोजी एसीबीच्या पथकाने महागाव वनपरिक्षेत्र कार्यालयात सापळा रचला. संगणक ऑपरेटर विनोद सोळंके याने वनपाल व वनमजुराच्या संमतीने तक्रारदाराकडून ४,००० रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने तिघांनाही ताब्यात घेतले. आरोपींच्या ताब्यातून लाचेची रक्कम ४,००० रुपये आणि चलनाचे ७०० रुपये असे एकूण ४,७०० रुपये जप्त करण्यात आले. या प्रकरणी आरोपींविरुद्ध महागाव पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे.

# २,०५२ गावांची नजर अंदाज पैसेवारी ५० पैशांखाली

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**यवतमाळ** : खरीप हंगाम २०२६-२७ साठी यवतमाळ जिल्ह्याची नजर अंदाज पैसेवारी ४७ पैसे जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यातील एकाही गावाची नजर अंदाज पैसेवारी ५० पैशांपेक्षा अधिक नसल्याचे जिल्हा प्रशासनाने प्रसिद्ध केलेल्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांकडून प्राप्त झालेल्या तालुकानिहाय प्रस्तावांच्या आधारे लागवडीयोग्य २,०५२ गावांची नजर अंदाज पैसेवारी निश्चित करण्यात आली.

तालुकानिहाय पाहता यवतमाळ तालुक्यातील १३५ गावांची पैसेवारी ४७ पैसे, कळंबमधील १४१ गावांची ४७ पैसे, बाभूळगावातील १३३ गावांची ४८ पैसे, आर्णीतील १०६ गावांची ४७ पैसे, दारव्ह्यातील १५० गावांची ४७ पैसे, दिग्रसमधील ८२ गावांची ४७ पैसे आणि नेर तालुक्यातील १२१ गावांची ४७ पैसे आहे.

पुसद तालुक्यातील १८७ गावांची नजर अंदाज पैसेवारी ४८ पैसे, उमरखेडमधील १३६ गावांची ४७ पैसे, महागावमधील ११२ गावांची ४८ पैसे, केळापूरमधील १३० गावांची ४९ पैसे, घाटंजीमधील १०७ गावांची ४७ पैसे, राळेगावमधील १३२ गावांची ४८ पैसे, वणीमधील १५५ गावांची ४८ पैसे, मारेगावमधील १०८ गावांची ४६ पैसे, तर झरी-जामणीमधील ११७ गावांची पैसेवारी ४९ पैसे नोंदविण्यात आली आहे.

जिल्ह्यातील सर्व २,०५२ गावांची नजर अंदाज पैसेवारी ५० पैशांपेक्षा कमी असल्याने खरीप हंगामातील पीक परिस्थितीचे हे प्राथमिक चित्र मानले जात आहे. यासंदर्भातील माहिती जिल्हाधिकारी कार्यालयातील तहसीलदार (महसूल) यांनी दिली.

# ४ ऑक्टोबरपासून जनता दरबार

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**पांढरकवडा** : लाडकी बहीण योजनेचे अनुदान अचानक बंद झालेल्या महिलांच्या समस्या जाणून घेण्यासाठी यवतमाळ जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने ४ ऑक्टोबर रोजी पांढरकवडा येथे जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले आहे. नगरपरिषदेच्या बचत भवन येथे सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत हा उपक्रम होणार आहे. अनुदान बंद होण्यामागील अडचणी, कागदपत्रांशी संबंधित समस्या तसेच योजनेच्या लाभाबाबत महिलांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक, महिला काँग्रेस जिल्हाध्यक्ष वंदनाताई आवारी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. लाभार्थींनी आधार कार्ड, बँक पासबुक व बँक खात्याशी जोडलेला मोबाईल सोबत आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे. जनता दरबाराचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महिला काँग्रेस जिल्हा उपाध्यक्ष वाणीताई अखिल कोठारे (तोडासे) यांनी केले आहे.

# उमरी इजारा कचरा डेपोसाठी पक्का रस्ता बांधा

## संजय गावंडे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**आर्णी** : आर्णी शहरातील कचरा व्यवस्थापनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, उमरी इझारा येथील नवीन कचरा डेपोपर्यंत पक्का रस्ता नसल्याने कचरा वाहतुकीत अडथळे निर्माण होत आहेत. त्यामुळे कचरा वाहतूक करणारी वाहने जुन्या दिग्रस रोडवरील जागेवरच कचरा टाकत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. उमरी इझारा येथील कचरा डेपोपर्यंत सिमेंट-काँक्रीटचा रस्ता तातडीने बांधण्यात यावा, अशी मागणी शिवसेना शहर संघटक संजय गावंडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आर्णी शहरातील दिग्रस रोडवरील नगरपरिषदेचे डम्पिंग ग्राउंड उमरी इझारा येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. जुन्या डम्पिंग ग्राउंडच्या परिसरात आदिवासी शासकीय वसतिगृहाची इमारत उभारण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने कचरा डेपो शहरापासून सुमारे



चार ते पाच किलोमीटर अंतरावर हलविण्यात आला. मात्र, नवीन ठिकाणी जाण्यासाठी असलेला रस्ता कच्चा व खड्डेमय असल्याने कचरा वाहतूक अडचणीची ठरत आहे.

रस्त्याअभावी कचरा वाहक वाहने उमरी इझारा येथे न जाता दिग्रस रोडवरच कचरा टाकत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे शहरातील महत्त्वाच्या वर्दळीच्या मार्गावर दुर्गंधी पसरत असून, कचऱ्यामुळे कुत्रे व इतर जनावरे रस्त्यावर येत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. नागरिक, वाहनधारक आणि पादचाऱ्यांना याचा त्रास सहन करावा लागत आहे.

उमरी इझारा येथील डेपोपर्यंतचा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा आमदार निधीतून मंजूर करून तातडीने बांधण्यात यावा. रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत पर्यायी मार्गाची व्यवस्था करून दिग्रस रोडवर कचरा टाकणे बंद करावे, अशी मागणीही गावंडे यांनी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती पालकमंत्री, आमदार आर्णी-कळंब विधानसभा मतदारसंघ, तहसीलदार आर्णी आणि नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

"कचरा डेपो स्थलांतरित करण्याचा निर्णय झाला असला, तरी रस्त्याअभावी जुन्या ठिकाणी कचरा टाकला जात असेल तर नागरिकांच्या आरोग्याचा आणि वाहतूक सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो. प्रशासनाने उमरी इझारा येथील रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करावे," अशी मागणी संजय गावंडे यांनी केली.

# कृषी साहित्याची चोरी

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**नेर** : सावरगाव काळे शिवारातील विविध शेतकऱ्यांच्या शेतातून अज्ञात चोरट्यांनी कृषी पंपांच्या मोटारी आणि सुमारे ४०० फूट कॉपर केबल लंपास केली. या चोरीत सुमारे ४६ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला. याप्रकरणी मुरलीधर खुशालराव गायकवाड यांच्या तक्रारीवरून नेर पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. सतीश काळे, किशोर जयस्वाल, चंद्रकला ठाकरे, राजू काळे, संतोष काळे, निवृत्ती काळे, अमोल देशमुख व रामेश्वर काळे यांच्या शेतातील मोटारी व केबल चोरीस गेल्याचे तक्रारीत नमूद आहे. या घटनेमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, पोलिसांकडून चोरट्यांचा शोध घेतला जात आहे.

# उमरखेड पोलिस ठाण्यात माहिती अधिकार दिन



प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**उमरखेड** : शासनाच्या आदेशानुसार उमरखेड पोलिस ठाण्यात २९ सप्टेंबर रोजी माहिती अधिकार दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रभारी ठाणेदार अमोल गुंडे यांनी उपस्थितांना माहिती अधिकार कायद्याबाबत मार्गदर्शन केले.

माहिती अधिकार कायद्यामुळे नागरिकांना शासकीय कामकाजाबाबत माहिती मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्यांतर्गत प्राप्त होणाऱ्या माहितीचा समाजहितासाठी योग्य विनियोग व्हावा, असे आवाहन गुंडे यांनी केले. तसेच पोलिस विभागाकडून आवश्यक माहिती नागरिकांसमोर ठेवून कारभारात पारदर्शकता वाढविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

यावेळी पोलिस ठाण्यातील अधिकारी, कर्मचारी तसेच प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

# सरपंच रमेश चव्हाण यांचा महाराष्ट्ररत्न पुरस्काराने गौरव

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**आर्णी** : आर्णी तालुक्यातील केळझरा को. येथील सरपंच रमेश चव्हाण यांना महाराष्ट्ररत्न गुणगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुणे येथील पत्रकार भवनात २७ सप्टेंबर रोजी नालंदा ऑर्गनायझेशनच्या वतीने महाराष्ट्ररत्न गुणगौरव सन्मान सोहळा २०२६ पार पडला.




राज्यातील उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती व सरपंचांचे संस्थेच्या वतीने सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणातून उल्लेखनीय काम करणाऱ्या सरपंचांची आदर्श सरपंच महाराष्ट्ररत्न पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. त्यामध्ये रमेश चव्हाण यांचा समावेश होता. त्यांना सन्मानचिन्ह, मानपत्र व पदक देऊन गौरविण्यात आले. तसेच गेल्या पाच वर्षांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या राज्यातील दहा ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली. यामध्ये केळझरा को. ग्रामपंचायतीचा समावेश असून, ग्रामपंचायतीलाही सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या दुहेरी सन्मानाबद्दल सरपंच रमेश चव्हाण आणि ग्रामपंचायतीचे अभिनंदन होत आहे.

# मुख्य निवडणूक आयुक्तांचा पुतळा जाळणाऱ्या काँग्रेस जिल्हाध्यक्षांसह प्रमुख नेत्यांवर गुन्हा

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**यवतमाळ** : मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात निदर्शने करताना विनापरवानगी आंदोलन उभारणे, सार्वजनिक रस्ता अडवणे आणि जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात शांतता भंग केल्याप्रकरणी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांवर यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील आमरोडवर कापडी टेंट उभारून व लाऊडस्पीकर लावून धरणे आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनासाठी नगरपरिषद प्रशासन किंवा पोलीस विभागाची कोणतीही पूर्वपरवानगी घेण्यात आली नव्हती. आंदोलनादरम्यान मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात घोषणाबाजी करत त्यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालय हे घोषित शांतता क्षेत्र असतानाही तेथे ध्वनिक्षेपकाचा वापर करून शासकीय कामात व सार्वजनिक वाहतुकीत अडथळा निर्माण केल्याचा ठपका आंदोलकांवर ठेवण्यात आला आहे.

याप्रकरणी पोलीस हवालदार चिंतामण दामोधर यांच्या तक्रारीवरून काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. सचिन नाईक, जिल्हा सरचिटणीस सुरेश नरवाडे, राजकुमार पत्रे, जिल्हा सचिव विनोद इंगळे, अ‍ॅड. सिमा तेलंग, ओबीसी सचिव मनोज पाचघोरे, शशांक केडे यांच्यासह इतर २० ते २५ कार्यकर्त्यांवर गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

पोलीस प्रशासनाने दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम २२३ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ च्या कलम १३५, ३७ (१) व (३) अन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवदर्शन बिरादार करत आहे.

# अंबोना तलावात महिलेचा मृतदेह आढळला

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**उमरखेड** : शहरालगत चुरमुरा रोडवरील अंबोना तलावात पाण्यावर तरंगताना आढळलेल्या महिलेच्या मृतदेहाची ओळख पटली आहे. अलका तुकाराम वाढवेकर (वय ३२, रा. खरूस खुर्द, ता. उमरखेड) असे मृत महिलेचे नाव आहे. शवविच्छेदनानंतर सोमवारी (दि. ३०) मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. याप्रकरणी उमरखेड पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ सप्टेंबर रोजी दुपारी २.४२ वाजताच्या सुमारास अंबोना तलावाच्या पाण्यात अज्ञात महिलेचा मृतदेह तरंगत असल्याची माहिती ११२ क्रमांकावरून पोलिसांना मिळाली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला.



तपासादरम्यान तलावाजवळील झाडाला लटकवलेल्या पर्समध्ये आधार कार्ड आढळले. त्यावरून मृत महिलेची ओळख अलका वाढवेकर अशी पटली. पोलिसांनी नातेवाईकांशी संपर्क साधल्यानंतर तिची बहीण माधुरी हिने मृतदेह अलका हिचाच असल्याचे ओळखले.

शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. अंत्यविधीनंतर याबाबत सविस्तर तक्रार देणार असल्याचे माधुरी यांनी पोलिसांना दिलेल्या जबाबात नमूद केले आहे.

सहाय्यक पोलिस अधीक्षक गौरव कायंदे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी ठाणेदार अमोल गुंडे व बीट जमादार दिलीप चव्हाण पुढील तपास करीत आहेत.

# लाडकी बहीण योजनेपासून वंचित महिलांच्या समस्या घेतल्या ऐकून

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**महागाव** : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळण्यापासून वंचित राहिलेल्या महिलांच्या समस्या जाणून घेण्यासाठी महागाव येथे काँग्रेसच्या वतीने महिला जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले. तालुका काँग्रेस कमिटी कार्यालयात बुधवारी (३० सप्टेंबर) झालेल्या या उपक्रमाला महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या अडचणी मांडल्या.



महिलांना योजनेचा लाभ मिळत नसल्याच्या कारणांचा आढावा यावेळी घेण्यात आला. अर्जातील त्रुटी, कागदपत्रांशी संबंधित अडचणी तसेच योजनेचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रक्रियेबाबत उपस्थित महिलांना मार्गदर्शन करण्यात आले.

महिला काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्ष वंदनाताई आवारी, नीलिमाताई काळे, काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष महेंद्र कावळे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनील राठोड, युवक काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष इम्रान पठाण, माजी नगराध्यक्ष सुनंदाताई कोपरकर, नगरसेविका सुरेखाताई कोपरकर आणि नगरसेविका रूपाली कोलेकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

जनता दरबाराच्या आयोजनासाठी महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्ष जयश्री संजय नरवाडे, शहराध्यक्ष सीमा नरवाडे, हसीना आगवान, दीक्षा धम्मानंद कावळे, सीमाताई जाधव, प्रसिक पाईकराव यांच्यासह कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन समाधान पाटील राऊत यांनी केले.

# जांबबाजार ग्रामपंचायत 'रामभरोसे'

## दूषित पाण्यामुळे साथीच्या आजारांची भीती

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**जांबबाजार** : जांबबाजार ग्रामपंचायतीचा कार्यकाळ संपून जवळपास सहा महिने उलटले आहेत. काही काळ सरपंच प्रशासक म्हणून काम पाहिल्यानंतर आता विस्तार अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मात्र, गावातील समस्यांमध्ये अद्याप अपेक्षित सुधारणा झालेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

गावातील अनेक रस्ते खोदून ठेवण्यात आले असून, त्यांची दुरुस्ती अद्याप झालेली नाही. पाणीपुरवठाही आठवड्यातून एकदा होत असल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. त्यातच दूषित पाणी मिळत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. गावात अतिसार, मलेरियासह साथीचे आजार वाढत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

ग्रामविकास अधिकारी दोन गावांचा कारभार पाहत असल्याने ते जांबबाजारमध्ये नियमित उपलब्ध नसल्याचीही नागरिकांची तक्रार आहे. विविध शासकीय कामांसाठी नागरिकांना कार्यालयात प्रतीक्षा करावी लागत आहे.

गावात स्वच्छतेसाठी ब्लिचिंग पावडरचा वापर तसेच फवारणी करण्याची मागणी होत आहे. आरोग्य विभाग आणि ग्रामपंचायत प्रशासन आता कोणत्या उपाययोजना करणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.



# डाव्या आघाडीची मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी

प्रतिनिधी १ ऑक्टोबर



**अमरावती :** देशातील लोकशाही, संविधान आणि मतदारांच्या मतदानाच्या अधिकाराच्या रक्षणासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्ष व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने आज जिल्हाधिकारी कार्यालयावर जोरदार आंदोलन करण्यात आले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आंदोलनकर्त्यांनी निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीविरोधात तीव्र घोषणाबाजी केली.

निवडणूक आयुक्त सुखबीरसिंग संधू आणि विवेक जोशी यांनी गेल्या दहा महिन्यांत किमान १४ वेळा विविध निर्णय व आदेशांवर लेखी आक्षेप नोंदविले आहेत. यातील चार आक्षेप एकाच दिवशी नोंदविल्याचे वृत्त आहे. त्यांच्या आक्षेपांमध्ये मतदारांची नावे समाविष्ट करणे अथवा वगळणे, Form-6 मधील बदल, मतदारांच्या डेटाबेसचे केंद्रीकरण आणि निवडणूक सॉफ्टवेअरच्या कार्यपद्धतीसारख्या महत्त्वाच्या बाबींचा समावेश असल्यामुळे निवडणूक आयोगाने घेतलेले अलीकडचे निर्णय भारतीय जनता पक्षाच्या राजकीय फायद्यासाठी घेतल्याचे स्पष्ट होते म्हणून ज्ञानेश कुमार याला यापुढे मुख्य निवडणूक आयुक्त पदावर राहण्याचा कोणताही नैतिक अधिकार नाही.

निवडणूक आयोग कोणत्याही सत्ताधाऱ्याच्या दबावाखाली काम करणारी संस्था नसून संविधानिक संस्था आहे. आयोगाची स्वायत्तता, निष्पक्षता आणि जनतेचा विश्वास अबाधित राहणे अत्यावश्यक आहे. या करिता लोकशाहीची हत्या करणारा व करोडो भारतीय नागरिकांना त्यांच्या घटनादत्त मतदानाच्या अधिकारापासून वंचित करणारा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार याला त्वरीत पदावरून दुर करण्याची मागणी डाव्या आघाडीने केली आहे.

लोकशाहीची हत्या करणारा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा द्यावा.

निवडणूक प्रक्रीयेतून EVM ला हद्दपार करून यापूढील सर्व निवडणुका बॅलेट पेपरवर घ्या.

आंदोलनात भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव कॉ .सुनिल मेटकर , आयटकचे जिल्हाध्यक्ष कॉ जे. एम . कोठारी ,मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ . सुभाष पांडे ,पक्षाचे जिल्हा सचिव कॉ रमेश सोनुले यांचे सह डाव्या आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते सुशिल ढोले ,जितेंद्र कोरडे , निरंजन बेले ,लताताई सोनारकर , मनोहर वाढोणकर,जयेंद्र भोगे , ओमप्रकाश कुटेमाटे ,साहेबराव विधळे , एम वाय शहाणे , प्रा . विजय रोडगे ,राजेंद्र भांबोरे ,सागर दर्योधन , विनोद जोशी ,सतिश चौधरी , श्याम शिंदे , हरिदास राजगिरे , विनोद तरेकर , पद्मा गजभिये , आशा वैद्य , निळकंठ ढोके, नईम मिर्झा , प्रांजली शिंदे आदी सहभागी होते.

# मध्यवर्ती कारागृहात ‘अभिविक्षक मंडळा’ची त्रैमासिक बैठक संपन्न

## आधुनिक पाकगृहाचे उद्घाटन, सुरक्षेबाबत महत्त्वपूर्ण निर्देश

प्रतिनिधी १ ऑक्टोबर



**अमरावती :** मध्यवर्ती कारागृह येथे मंगळवारी, दि. 29 सप्टेंबर जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली कारागृह अभिविक्षक मंडळाची त्रैमासिक बैठक पार पडली. या बैठकीत जिल्ह्यातील प्रमुख सर्व विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कारागृह परिसराची प्रत्यक्ष पाहणी व समस्यांचा आढावा बैठकीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागांच्या प्रतिनिधींसह कारागृहातील संपूर्ण परिसराची पाहणी केली. त्यांनी पाकगृह, रुग्णालय, मुलाखत कक्ष, धान्य गोदाम, उपहारगृह, सुतारकाम विभाग, ग्रंथालय, रेडिओ कक्ष, मुक्त विद्यापीठाचे अभ्यासकेंद्र, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग कक्ष, बंदी बरॅक आणि अतिसुरक्षा कक्षाला भेट देऊन माहिती घेतली व समस्या जाणून घेतल्या.

तसेच, डीपीडीसी अंतर्गत आधुनिकीकरण करण्यात आलेल्या नवीन पाकगृहाचे उद्घाटन जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले. आधुनिक सोयीसुविधांनी युक्त काम पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. याशिवाय व्हीसी क्युबिकल्स कक्षास भेट देऊन ऑनलाइन कोर्टपेशी, वकील व नातेवाईकांच्या मुलाखतींच्या सादरीकरणाची पाहणी करून आवश्यक सूचना दिल्या. कारागृहातील विद्युत व्यवस्था विनाखंड सुरू राहण्यासाठी एक्स्प्रेस फीडर बसवून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. तसेच वायरिंग दुरुस्तीची कामे डीपीडीसी निधीतून पूर्ण करण्याचे निर्देश दिले. सुरक्षेच्या कारणास्तव कारागृहाबाहेरील हायवेच्या बाजूने व्ह्यू-कटर बसवण्याचे काम तात्काळ पूर्ण करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले. बंद्यांना वेळेवर न्यायालयात आणि वैद्यकीय उपचारासाठी नेण्यासाठी पोलीस पथकाची कमतरता भासू नये, म्हणून कारागृह व पोलीस विभागाने दरमहा समन्वय बैठक घेण्याच्या सूचना दिल्या.

बंद्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी ‘कार वॉशिंग सेंटर’चे काम पूर्ण करण्याचे आणि सोलर प्रशिक्षणासोबतच इतर नवीन कौशल्य विकास प्रशिक्षण सुरू करण्याचे निर्देश दिले. या बैठकीला जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम, पोलीस उपायुक्त प्रांजली सोनावणे, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी नरेंद्र वानखेडे, अशासकीय सदस्य धनानंद नागदिवे, कारागृह अधीक्षक कीर्ती चिंतामणी, तुरुंगाधिकारी हेमंत इंगोले, कारागृह शिक्षक ललित मुंडे, संजय घोलप उपस्थित होते.

# अमरावती जिल्हा बुडो मार्शल आर्ट च्या खेळाडूंचे राज्यस्तरीय बुडो मार्शल आर्ट स्पर्धेत यश

प्रतिनिधी १ ऑक्टोबर



**अमरावती:** २७ सप्टेंबर २०२६ रोजी हनुमान सेवा ट्रस्ट सभागृह काळेपडळ हडपसर पुणे येथे राज्यस्तरीय बुडो मार्शल आर्ट स्पर्धा संपन्न झाली यात अमरावती जिल्हा बुडो मार्शल आर्ट असोसिएशन च्या १४ खेळाडूंनी घवघवीत यश संपादन केले.

या स्पर्धेत संपूर्ण महाराष्ट्र मधून राज्यस्तरीय बुडो महाराष्ट्र स्पर्धेत काता व कुमिते स्पर्धा घेण्यात आले होते. अमरावती जिल्ह्याचे बुडो मार्शल आर्टच्या मुली आणि मुलांनी आपल्या कौशल्याचा वापर करून उत्कृष्ट यश संपादन केले यात अमरावती जिल्हा बुडो मार्शल आर्ट असोसिएशन चे अध्यक्ष सेंसेई उमेश मोवळे यांच्या मार्गदर्शनात प्रशिक्षण घेत असलेल्या मुलांमधे तनीष मोवळे सुवर्ण पदक, युवान शिंगाडे सुवर्ण पदक, देवांश आगळे सुवर्ण पदक, स्वराज नाईकनवरे रौप्य पदक, आनंद पारिसे रौप्य पदक, हिमांशु तवाडे कांस्य पदक, शौर्य खोलापुरे कांस्य पदक तर मुलींमधे गोजीरी कोंडे सुवर्ण पदक, काव्या कुलकर्णी रौप्य पदक, ओजस्वी थोरात रौप्य पदक, उत्कर्षा पारिसे कांस्य पदक, माहेश्वरी सदावर्ते कांस्य पदक, श्रेया शिंदे कांस्य पदक, मुक्ताई धर्माळकर कांस्य पदक घेऊन यश संपादन केले. वरील खेळाडू ची निवड आगामी होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली आहे. राज्यस्तरीय स्पर्धेत विजयी खेळाडूंचे अभिनंदन बुडो मार्शल आर्ट राष्ट्रीय अध्यक्ष सुधाकर पणीकर, महाराष्ट्राचे अध्यक्ष शिहान लहु पारवे, राष्ट्रीय तांत्रिक अधिकारी शिहान सचिन पट्टेकर, महाराष्ट्राचे तांत्रिक अधिकारी शिहान संतोष कुलकर्णी, अमरावती जिल्हा बुडो मार्शल आर्ट असोसिएशन चे अध्यक्ष सेंसेई उमेश मोवळे, उपाध्यक्ष चेतन वाटणकर, सागर मेश्राम, सचिव विशाल चव्हाण, कोषाध्यक्ष आशिष वाघमारे, मनस्वी कोंडे यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. अशी माहिती उमेश मोवळे अध्यक्ष अमरावती जिल्हा बुडो मार्शल आर्ट असोसिएशन अमरावती यांनी दिली.

# शहरात 15 दिवस निर्बंध; नवदुर्गोत्सव-शारदोत्सव या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी काढले आदेश

प्रतिनिधी १ ऑक्टोबर



**अमरावती:** अमरावती शहर आणि परिसरात आगामी नवदुर्गोत्सव आणि शारदोत्सवच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 36 अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. हे आदेश 13 ऑक्टोबर, 2026 रोजी पर्यंत लागू राहतील.

दि. 11 ऑक्टोबर, 2026 रोजी घटस्थापना असून त्यादिवशी नवदुर्गोत्सव/शारदोत्सव तसेच नवरात्री उत्सवास प्रारंभ होणार आहे. त्याचप्रमाणे पोलीस आयुक्त अमरावती कार्यक्षेत्रामध्ये दुर्गादेवी व शारदादेवींची मोठ्या प्रमाणात स्थापना करण्यात येणार असून स्थापना मिरवणुकींचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात येणार आहे. तसेच अंबादेवी/ एकविरादेवी मंदीर परिसरात भव्य यात्रेचे आयोजन करण्यात येत असून श्री अंबादेवी/ एकविरादेवी मंदीरात दर्शनाकरीता दररोज 9 दिवस भाविकांची विशेषत: महिला वर्ग यांची प्रचंड गर्दी राहते. तसेच नवरात्री दरम्यान दररोज विविध ठिकाणी रास गरबा, दांडिया नृत्याचे आयोजन सुध्दा करण्यात येणार आहे.

या आदेशानुसार, अमरावती पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील सर्व पोलीस ठाण्यांच्या अंमलदारांना व वरिष्ठ अधिकाऱ्यांना कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी विशेष अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. रस्त्यावरून जाणाऱ्या मिरवणुकीतील किंवा जमावातील लोकांनी कसे वागावे, मिरवणुका कोणत्या मार्गाने व कोणत्या वेळी काढाव्यात, याचे अधिकार पोलिसांना राहतील. कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा रस्त्यावर गाणी गाणे, ढोल-ताशे व इतर कर्कश वाद्ये वाजविण्यावर पोलिसांचे नियंत्रण असेल.

इतर कोणत्याही व्यक्तीने या आदेशाचे उल्लंघन केल्यास, तो महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 134 प्रमाणे कायदेशीर कारवाईस पात्र राहील, असे या आदेशात सांगण्यात आले आहे.

# देशीदारू विक्री करणाऱ्या विरुद्ध कारवाई

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अमरावती :** पोलीस आयुक्त यांनी गुन्हे शाखेची बैठक घेवुन आदेश दिले की, आगामी काळात होणा-या सण उत्सवा दरम्याण शहरात शांतता अबाधीत राहावी या करीता शहरात चालणा-या अवैध्यधंदयांवर तसेच अंमली पदार्थाचे सेवन करूण उतपात करणा-या इसमा विरूध्द कठोर कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याने गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांचे नेतृत्वात गुन्हे शाखा युनिट-२ नी केलेली कार्यवाही खालील प्रमाणे.

दारूबंदी केसेस

पो.स्टे. गाडगेनगर हददीमधील छत्रसाल नगर तसेच विलास नगर येथे एकुण तिन इसमांवर दारूबंदी कायदया अन्वये कार्यवाही करण्यात आली.

ताब्यात घेतलेल्या इसमांची नावे शामलाल गणेश यादव वय ५० वर्ष रा. छत्रसाल नगर, अमरावती, सतिश विजयराव पाटील वय ४१ वर्ष रा. विलास नगर, अमरावती, एक महीला आरोपी, रा. छत्रसाल नगर, अमरावती

जप्त मुददेमाल: एकुण ६,७००/- रू. चा प्रोव्हिशन मुददेमाल अंमली पदार्थ सेवन बाबतची कार्यवाही पो.स्टे. सिटी कोतवाली हददीतील उस्मानिया मस्जीद जवळ सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थाचे सेवन करीत असतांना मिळुन आल्याने कार्यवाही ताब्यात घेतलेल्या इसमाचे नाव

अब्दुल जब्बार अब्दुल खालीद वय ४७ वर्ष रा. पठाण चौक, अमरावती सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त राकेश ओला अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त (परिमंडळ ०१) यशवंत सोळंके, मा. पोलीस उपायुक्त (परिमंडळ ०२) श्याम घुगे, मा. पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे प्रांजली सोनवणे, सपोआ निलेश ब्राम्हणे (गुन्हे) यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे पो. नि. अतुल वर, पो. नि. दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात सपोनि, महेश इंगोले, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, दिपक सुंदरकर, गजानन ठेवले, आस्तिक देशमुख, मनोज ठोसर, मंगेश परिमल, सचिन बहाळे, जहीर शेख, मिर्झा नईम बेग, अतुल संभे, विकास गुडधे, विशाल वाकपांजर, योगेश पवार, रानीक रायलीवाले, चेतन गुल्हाणे, चालक संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली आहे.

# अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक 2026

## विभागीय आयुक्त कार्यालयात तक्रार नियंत्रण/निवारण कक्ष स्थापन

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अमरावती:** अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेचे कामकाज सुरळीतपणे पार पाडण्यासाठी विभागीय स्तरावर तक्रार नियंत्रण/ निवारण कक्ष विभागीय आयुक्त कार्यालयात स्थापन करण्यात आला आहे. तक्रारदारांना निवडणुकीसंदर्भातील तक्रारींची नोंद प्रत्यक्ष तक्रार निवारण कक्षात तसेच ई-मेलद्वारेही करता येणार आहे. तक्रार निवारण कक्षाचा पत्ता नैसर्गिक आपत्ती कक्ष, पहिला माळा, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती विभाग, अमरावती असा असून तक्रारींसाठी ई-मेल: dycomm.amt@gmail.com आणि दूरध्वनी क्रमांक : ०७२१-२६६१३६४ व टोल फ्री क्रमांक : १८००४२५२१६४ असा आहे. यांची संबंधितांनी नोंद घ्यावी. असे विभागीय आयुक्त कार्यालयाचे अपर आयुक्त (आस्थापना) अमरावती विभाग, अमरावती यांनी कळविले आहे.

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातर्फे आरोग्य शिबिर उत्साहात

## श्री. गणेशा आरोग्याचा अभियानात 400 नागरिकांनी घेतला लाभ

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अमरावती :** गणेशोत्सवाच्या कालावधीत शहरात “श्री गणेशा आरोग्याचा अभियान 2026” यशस्वीरीत्या राबविण्यात आले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अमरावती यांच्या वतीने शहरातील विविध सार्वजनिक गणेशमंडळांमध्ये या आरोग्य व तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

या अभियानांतर्गत जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल बत्रा यांच्या मार्गदर्शनाखाली दंत व नेत्ररोग तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले.

यात दि. 16 सप्टेंबर रोजी सावता बाल गणेश उत्सव मंडळ, सावता कॉलनी, प्रशांत नगर, दि. 21 ते 23 सप्टेंबर रोजी रुक्मिणी गणेशोत्सव मंडळ, सायन्स कोर मैदान, दि. 24 सप्टेंबर रोजी सिद्धीविनायक गणेशोत्सव मंडळ, सिद्धीविनायक नगर, कठोरा नाका याठिकाणी शिबीर घेण्यात आले.

या शिबिरांचा एकूण 400 हून अधिक लाभार्थ्यांनी लाभ घेतला, ज्यामध्ये 228 पुरुष, 152 महिला आणि 22 मुलांचा समावेश होता. शिबिरादरम्यान नागरिकांना आरोग्यविषयक समुपदेशन व जनजागृती करण्यात आली, तसेच गरजू रुग्णांना पुढील विशेष उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात संदर्भित करण्यात आले.

सदर उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी, आंतरवासिता डॉक्टर तसेच समाजसेवा अधीक्षक आणि कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यातून चारा जिल्ह्याबाहेर नेण्यास बंदी; जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

प्रतिनिधी १ ऑक्टोबर



**अमरावती :** जिल्ह्यात यावर्षी झालेल्या अल्प पावसामुळे आणि दुष्काळी परिस्थितीमुळे भविष्यात गुरांच्या चाऱ्याची टंचाई भासू नये, यासाठी जिल्ह्याच्या हद्दीबाहेर हिरवा व वाळलेला चारा, गवत आणि वैरणीची विक्री व वाहतूक करण्यास तातडीने बंदी घालण्यात आली आहे. यासंदर्भातील आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी आशिष येरेकर यांनी जारी केले आहेत.

सन 2026 च्या खरीप हंगामात घोषित करण्यात आलेल्या ‘ट्रिगर-१’ मध्ये जिल्ह्यातील सर्व 14 तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने चारा उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे पशुधनाला पुरेशा प्रमाणात चारा उपलब्ध राहावा या उद्देशाने ‘महाराष्ट्र वैरण (निर्यात नियंत्रक) आदेश 2001’ मधील तरतुदींचा वापर करून ही वाहतूक बंदी घालण्यात आली आहे.

हा आदेश 29 सप्टेंबर 2026 पासून पुढील पुढील आदेश येईपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात लागू राहील. या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश पोलीस प्रशासन, महसूल विभाग, प्रादेशिक परिवहन अधिकारी आणि संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आले आहेत.

# 2 ऑक्टोबरच्या ग्रामसभेत ‘बालविवाहमुक्त गाव’चा ठराव घ्या; मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे ग्रामपंचायतींना निर्देश

## जनजागृतीसह प्रतिबंधात्मक कार्यवाहीवर भर

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अमरावती:** बालविवाह ही सामाजिकदृष्ट्या घातक प्रथा असून त्याचा बालकांच्या शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि सर्वांगीण विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. बालविवाह प्रतिबंध अधिनियम, 2006 नुसार बालविवाहास प्रतिबंध करण्यासाठी अमरावती जिल्ह्यात व्यापक जनजागृती व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत आहेत. याच अनुषंगाने 2 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ग्रामसभेत ‘बालविवाहमुक्त गाव’ याबाबतचा ठराव घेण्याचे निर्देश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना दिले आहेत.

ग्रामसभेच्या अजेंड्यामध्ये ‘बालविवाहमुक्त गाव’ हा विषय समाविष्ट करून त्यावर सविस्तर चर्चा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच बालविवाह प्रतिबंधाबाबतच्या कायदेशीर तरतुदी, बालविवाहाचे दुष्परिणाम आणि प्रतिबंधासाठी नागरिकांची भूमिका याबाबत ग्रामस्थांना माहिती देण्याचे निर्देश आहेत.

ग्रामसभेत “आमच्या गावामध्ये कोणत्याही बालकाचा बालविवाह होणार नाही तसेच बालविवाहास प्रोत्साहन दिले जाणार नाही” अशा आशयाचा ठराव सर्वानुमते अथवा बहुमताने मंजूर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**ग्रामस्तरीय यंत्रणांचा सक्रिय सहभाग**

बालविवाह प्रतिबंधाच्या कार्यात गावातील पालक, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा सेविका, ग्रामसेवक, पोलीस पाटील, स्वयंसेवी संस्था तसेच संबंधित घटकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. गावामध्ये संभाव्य बालविवाहाची माहिती मिळाल्यास ती तात्काळ संबंधित बालविवाह प्रतिबंधक अधिकारी, पोलीस विभाग, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी, किंवा चाइल्ड हेल्पलाईन 1098 यांना देण्याबाबतही जनजागृती करण्यात येणार आहे.

**ग्रामसभेतील कार्यवाहीचे दस्तऐवजीकरण**

ग्रामसभेतील ठराव, उपस्थितीपत्रक, जनजागृती कार्यक्रमांची छायाचित्रे/व्हिडिओ तसेच बालविवाह प्रतिबंधासाठी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल जतन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ठराव मंजूर झालेल्या गावांची यादी व संबंधित ठराव ग्रामपंचायत समिती स्तरावर संकलित करून तालुकानिहाय अहवाल जिल्हा प्रशासनाकडे सादर करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

बालविवाह प्रतिबंधाच्या दृष्टीने आवश्यक निकष पूर्ण करणाऱ्या गावांना ग्रामसभेतील ठरावाच्या आधारे ‘बालविवाहमुक्त गाव’ म्हणून घोषित करण्याबाबत पुढील कार्यवाही संबंधित मार्गदर्शक सूचनांनुसार करण्यात येणार आहे.

“बालविवाहमुक्त गाव” ही संकल्पना केवळ ग्रामसभेतील ठरावापुरती मर्यादित न ठेवता, गावात सातत्यपूर्ण जनजागृती, दक्षता आणि प्रतिबंधात्मक कार्यवाही प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक गाव बालविवाहमुक्त करण्यासाठी ग्रामपंचायत, प्रशासन आणि नागरिकांनी समन्वयाने कार्य करण्याची गरज असून, 2 ऑक्टोबरच्या ग्रामसभेत याबाबत ठोस संकल्प करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# डिजे टाळून विसर्जन मिरवणूकीत सहभागी झालेल्या गणेश मंडळांचा सत्कार

## संस्कृती जपणाऱ्या मंडळांचा जिजाऊ फिटनेस कडून होणार गौरव
## २ ऑक्टोबर रोजी नप सभागृहात संपन्न होणार कार्यक्रम

प्रतिनिधी 1 ऑक्टोंबर

**मलकापूर :** शहरात नुकताच श्री गणेश विसर्जन सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. या विसर्जन मिरवणुकीत डीजेचा वापर न करता पारंपरिक वाद्यांचा वापर करून सहभागी झालेल्या गणेश मंडळांचा येथील जिजाऊ मॉर्निंग फिटनेस क्लबच्या वतीने विशेष सत्कार आयोजित करण्यात आला आहे. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा उत्सव आहे.



ढोल-ताशा, लेझीम, साहसी खेळ यांसारख्या पारंपरांचा लोकसंस्कृतीत विशेष स्थान आहे. मात्र, आधुनिक काळात मोठ्या आवाजातील डीजे संस्कृतीमुळे या पारंपरिक वाद्यांची आणि लोककलांची ओळख काही प्रमाणात कमी होत असल्याचे चित्र दिसून येते. त्यामुळे गणेशोत्सवाच्या माध्यमातून पारंपरिक वाद्यांना व्यासपीठ मिळणे आवश्यक आहे. याच सामाजिक व सांस्कृतिक जाणीवेतून २ ऑक्टोबर शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता मलकापूर नगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात हा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

» डिजे संस्कृतीला फाटा देऊन पारंपरिक वाद्य संस्कृती जपणाऱ्या गणेश मंडळांचे कौतुक होणे स्वाभाविक आहे. डिजे नसल्याने आबाल वृद्ध व महिलांना विसर्जन मिरवणूकीत सहभागी होता आले, ही बाब भविष्यात अनुकरणीय आहे.
**अनिल गांधी,** नप उपाध्यक्ष

या सोहळ्यासाठी गणेश मंडळांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सचिव यांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन जिजाऊ फिटनेस क्लबच्या वतीने करण्यात आले आहे.

# आजपासून सवलतीच्या तिकिटासाठी प्रवाशांना एनसीएमसी कार्ड अनिवार्य !

## ज्येष्ठ नागरिक, महिलांना कार्ड किंवा क्यूआर पावतीशिवाय मिळणार नाही प्रवासात सवलत

प्रतिनिधी 1 ऑक्टोंबर

**खामगाव :** राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवास करणाऱ्या ज्येष्ठ नागरिक आणि महिला प्रवाशांना सवलतीच्या तिकिटासाठी आता एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. १ ऑक्टोबर २०२६ पासून बुलढाणा विभागासह राज्यातील सर्व विभागांमध्ये सवलतीचे तिकिट एनसीएमसी कार्डच्या माध्यमातूनच वितरित करण्यात येणार आहे. कार्ड किंवा वैध क्यूआर पावती नसल्यास सवलतीचा लाभ मिळणार नाही. बुलढाणा विभागातील आगार व बसस्थानकांमध्ये एनसीएमसी कार्ड नोंदणी व वितरणाची प्रक्रिया सुरू आहे. कार्ड अद्याप कार्यरत नसलेल्या मात्र नोंदणी केलेल्या प्रवाशांना क्यूआर कोड असलेली पावती देण्यात येत असून, त्याद्वारेही ठराविक कालावधीत सवलतीचा प्रवास करता येणार आहे. महामंडळाने ज्येष्ठ नागरिक, महिला प्रवासी तसेच आगारातील वाहक व पर्यवेक्षकीय कर्मचाऱ्यांसाठी यासंदर्भात स्वतंत्र सूचना जारी केल्या आहेत. बुलढाणा विभागातील सर्व आगारांमध्ये या प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

**क्यूआर पावतीला ३० दिवसांची मुदत**

१८ सप्टेंबरपासून एनसीएमसी कार्ड नोंदणी करणाऱ्या अमृत ज्येष्ठ नागरिक, ज्येष्ठ नागरिक व महिला सवलतधारकांना क्यूआर कोड असलेली पावती देण्यात येत आहे. वाहकाच्या ईटीआयएम मशिनद्वारे क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर सवलतीचे तिकिट मिळणार आहे. ही नोंदणी पावती ३० दिवसांपर्यंत ग्राह्य राहणार असून, या कालावधीत कार्ड सक्रिय करून त्यात टॉप-अप करणे आवश्यक आहे.

**सुमारे ३.३० लाख प्रवाशांची एनसीएमसीसाठी नोंदणी**

बुलढाणा विभागात एनसीएमसी कार्ड नोंदणीला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, आतापर्यंत सुमारे ३ लाख ३० हजार प्रवाशांनी नोंदणी केली आहे. यामध्ये ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक आणि महिला सवलतधारकांचा समावेश आहे. १ ऑक्टोबरपासून सवलतीचे तिकिट एनसीएमसी कार्डद्वारेच देण्यात येणार असल्याने उर्वरित पात्र प्रवाशांनीही वेळेत नोंदणी करून घेणे आवश्यक आहे.

**भीम ॲपवरूनही करता येणार टॉप-अप**

एनसीएमसी कार्डमध्ये रक्कम १ भरण्यासाठी भीमॲपद्वारे टॉप-अपची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. २ कार्डच्या मागील बाजूस असलेला क्यूआर कोड अपडेटेड भीम ॲपच्या माध्यमातून स्कॅन करून टॉप-अप करता येणार आहे. त्यामुळे कार्डमध्ये आवश्यक रक्कम भरण्यासाठी उपलब्ध असलेला हा पर्याय प्रवाशांना वापरता येईल.

**वाहकांना प्रशिक्षण पूर्ण करण्याच्या सूचना**

एनसीएमसी प्रणालीद्वारे सवलतीचे तिकिट वितरित होणार असल्याने बुलढाणा विभागातील सर्व आगारांमधील वाहक तसेच चालक तथा वाहकांना कार्यप्रणालीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. संबंधित कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्याची खातरजमा करून आवश्यक सूचना देण्याचे निर्देश महामंडळाने सर्व विभागीय स्तरावरील अधिकाऱ्यांना दिले आहेत.

# खामखेड येथून 70 वर्षीय वृद्ध बेपत्ता; अज्ञाताविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल

प्रतिनिधी 1 ऑक्टोंबर

**मलकापूर :** मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खामखेड येथून सुरेश सुखदेव कुयटे (वय ७०, रा. खामखेड) हे ७० वर्षीय वृद्ध संशयास्पद रित्या गायब झाले असून, याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरेश कुयटे हे २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास घरातून निघून गेले होते. गाव, परिसर व नातेवाइकांकडे शोध घेऊनही ते न मिळून आल्याने, त्यांचे मुलगे अविनाश कुयटे (वय २८) यांनी मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली. वडिलांचे अज्ञात कारणासाठी कोणीतरी अपहरण केल्याची शंका त्यांनी तक्रारीत व्यक्त केली आहे. त्यावरून पोलिसांनी ३० सप्टेंबर रोजी अज्ञाताविरुद्ध अप.क्र. १९७/२०२६, कलम १४०(३) बीएनएसएस नोंदवला आहे. बेपत्ता सुरेश कुयटे यांची उंची ६ फूट, बांधा सडपातळ असून अंगात पांढरा शर्ट, काळी फुल पॅन्ट, हातात घड्याळ आणि पायात काळी चप्पल आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास बिट अंमलदार सफौ बाळू टाकरखेडे करत असून, सदर वृद्धाबाबत काही माहिती मिळाल्यास मलकापूर ग्रामीण पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नांदुरा-जळगाव मार्गावरील अतिक्रमणे जमीनदोस्त

## राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची कारवाई

प्रतिनिधी 1 ऑक्टोंबर

**खामगाव :** नांदुरा - जळगाव जामोद मार्गालगत वाढलेली अतिक्रमणे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने बुधवार, ३० सप्टेंबर रोजी कारवाई करीत जमीनदोस्त केली. सकाळपासून सुरू असलेल्या या मोहिमेत दुकाने, हातगाड्या, पत्र्याचे शेड, तसेच अन्य स्वरूपाची अतिक्रमणे जेसीबीच्या साहाय्याने हटविण्यात आली. मार्गालगत मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाल्याने वाहतुकीला अडथळे निर्माण होत होते. पादचारी आणि वाहनचालकांना अरुंद जागेतून मार्ग काढावा लागत होता. अतिक्रमणामुळे महामार्गालगतचा परिसरही विद्रूप झाला होता.



त्यामुळे प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे उपविभागीय अधिकारी दयाराम कचाले यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. कारवाईपूर्वी संबंधित अतिक्रमणकर्त्यांना नोटिसा बजावण्यात आल्या होत्या.

**पोलिसांचा बंदोबस्त**

कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पथकाने एकामागून एक अतिक्रमणे हटविल्याने महामार्गालगतचा परिसर मोकळा झाला. त्यामुळे रस्त्याची प्रत्यक्ष रुंदीही स्पष्टपणे दिसू लागली असून, वाहतुकीला काही प्रमाणात दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे.

# घरगुती गॅसचा काळाबाजार; रिफिलिंगचे साहित्य जप्त

## ताजनगर व आठवडी बाजार परिसरात कारवाई

प्रतिनिधी 1 ऑक्टोंबर

**नांदुरा :** घरगुती गॅस सिलिंडरचा काळाबाजार व बेकायदेशीर रिफिलिंग केल्याचा संशयावरून पुरवठा विभागाने नांदुरा येथील दोन ठिकाणी कारवाई केली. ताजनगर तसेच आठवडी बाजारातील शासकीय धान्य गोदामाच्या मागील परिसरात बुधवार, ३० सप्टेंबर रोजी करण्यात आलेल्या या कारवाईत सात भरलेले गॅस सिलिंडर, एक रिकामा सिलिंडर, दोन नळ्या जोडलेली इलेक्ट्रिक मोटर, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि टूल किट असा एकूण ३७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी रुपेश विजय बिजेवार यांच्या मार्गदर्शनात ही कारवाई करण्यात आली. दुपारी सुमारे २ वाजता ताजनगर परिसरात तपासणी करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास शासकीय धान्य गोदामाच्या मागील परिसराची पाहणी करण्यात आली. दोन्ही ठिकाणी गॅस सिलिंडरमधून गॅस रिफिलिंग करण्यासाठी वापरले जाणारे साहित्य साठवून ठेवल्याचे आढळून आले. कारवाईत गॅस भरलेले सात सिलिंडर, एक रिकामा सिलिंडर असा अंदाजे ८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच दोन नळ्या जोडलेली इलेक्ट्रिक मोटर २३ हजार रुपये, इलेक्ट्रॉनिक वजनकाटा ५ हजार रुपये आणि टूल किट १ हजार ५०० रुपये किमतीचे जप्त करण्यात आले. कारवाईदरम्यान दोन्ही घटनास्थळी कोणतीही व्यक्ती उपस्थित नव्हती. तसेच संबंधित मुद्देमालाचा मालक कोण आहे, याची माहितीही निष्पन्न होऊ शकली नाही.

# खामगाव एमआयडीसीत 248 टन सोयाबीन तेलाचा साठा जप्त; 'एफडीए'ची कारवाई

## वैध परवाना नसल्याने ३.५० कोटींचा साठा ताब्यात

प्रतिनिधी 1 ऑक्टोंबर

**खामगाव :** औद्योगिक वसाहतीतील मेसर्स एमए ऑईल्स प्रायव्हेट लिमिटेड या आस्थापनेवर अन्न व औषध प्रशासनाच्या (एफडीए) पथकाने २८ सप्टेंबर रोजी कारवाई करीत तब्बल २४८.८४ टन रिफाइंड सोयाबीन तेलाचा साठा जप्त केला. या तेलाची किंमत ३ कोटी ५० लाख ८७ हजार २०१ रुपये एआय इमेज असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाकडून देण्यात आली.खामगाव एमआयडीसीतील प्लॉट क्रमांक ए-१३ ते ए-१८ येथे ही कारवाई करण्यात आली. संबंधित आस्थापनेकडून वैध परवान्याशिवाय अन्न व्यवसाय केला जात असल्याचे आढळून आल्याने प्रशासनाने साठ्याची तपासणी केली. तसेच तेथे साठविण्यात आलेल्या रिफाइंड सोयाबीन तेलाच्या गुणवत्तेबाबत संशय निर्माण झाल्याने त्याचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले. एवढ्या मोठ्या प्रमाणातील तेलसाठ्यावर कारवाई झाल्याने खामगाव एमआयडीसीतील अन्न व्यवसायाच्या परवान्यांसह गुणवत्ता मानकांच्या पालनाचा मुद्दाही चर्चेत आला आहे.

**तेलाचे नमुने विश्लेषणासाठी**

कारवाईदरम्यान रिफाइंड सोयाबीन तेलाचे नमुने घेण्यात आले असून, ते प्रयोगशाळेतील विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. तेलाचा दर्जा निर्धारित मानकांनुसार आहे किंवा नाही, हे प्रयोगशाळेच्या अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. अहवालानंतर तेलाच्या गुणवत्तेबाबतही पुढील कारवाईचे स्वरूप निश्चित होईल. या पथकाची कारवाई ही कारवाई सहाय्यक आयुक्त पी. एस. पाटील व सह आयुक्त एस. डी. केदारे यांच्या मार्गदर्शनात बुलढाणा अन्न व औषध प्रशासनाचे अन्न सुरक्षा अधिकारी जी. के. वसावे आणि ए. एस. भोपाळे तसेच अमरावती येथील अन्न सुरक्षा अधिकारी एस. ए. सूर्यवंशी यांनी केली.

**सणासुदीत खाद्यतेलाच्या भेसळीवर प्रशासनाची नजर**

सण-उत्सवाच्या काळात खाद्यतेलाची मागणी वाढत असल्याने भेसळीला आळा घालण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी केली जात आहे. मिठाई, फराळ तसेच तळलेल्या पदार्थांसाठी वापरल्या जाणाऱ्या तेलाचा दर्जा, साठवणूक आणि विक्रीसाठी आवश्यक परवान्यांची तपासणी करण्यात येत आहे.संशयास्पद तेलाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले जात आहेत. त्यामुळे विक्रेत्यांनी नियमांचे पालन करणे, तर ग्राहकांनी तेलाची पॅकिंग, उत्पादन तारीख, मुदत आणि परवाना क्रमांक तपासूनच खरेदी करणे आवश्यक आहे. भेसळ आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे.

# शेगाव रेल्वे स्थानकावर 07605 गाडीला थांबा देण्याची मागणी; रेल्वेमंत्र्यांना निवेदन

प्रतिनिधी 1 ऑक्टोंबर

**शेगाव :** हजूर साहिब नांदेड–उधना–हजूर साहिब नांदेड विशेष रेल्वे क्र. ०७६०५/०७६०६ चा शेगाव रेल्वे स्थानकावर दोन्ही दिशेने थांबा देण्यात यावा, अशी मागणी शेगाव प्रवासी संघटना व संघर्ष समितीच्या वतीने करण्यात आली आहे. रेल्वे प्रशासनाने जाहीर केलेल्या थांब्यांच्या यादीमध्ये ०७६०६ या गाडीला शेगाव येथे थांबा देण्यात आला आहे; मात्र ०७६०५ या त्याच गाडीच्या विरुद्ध दिशेच्या फेरीला शेगावचा थांबा दर्शविण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता असून, शेगाव येथून प्रवास करणाऱ्या भाविक व प्रवाशांना मोठी गैरसोय होऊ शकते. ही बाब तांत्रिक त्रुटीमुळे किंवा अन्य कारणामुळे झाली असण्याची शक्यता असून, शेगावसारख्या प्रमुख तीर्थक्षेत्राच्या दृष्टीने एकाच गाडीला



एका दिशेने थांबा व दुसऱ्या दिशेने थांबा न देणे अन्यायकारक ठरू शकते, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ५ ऑक्टोबर २०२६ पासून या विशेष गाडीचे संचालन सुरू होत असल्याने, त्यापूर्वीच ०७६०५ गाडीला शेगाव येथे थांबा देऊन दोन्ही दिशेने समान सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. हे निवेदन शेगांव रेल्वे स्टेशन मास्टर यांच्यामार्फत माननीय रेल्वे मंत्रालयाकडे पाठविण्यात आले असून, या निवेदनाच्या प्रती मा. ना. प्रतापरावजी जाधव, केंद्रीय मंत्री, भारत सरकार; महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई; तसेच विभागीय रेल्वे व्यवस्थापक, भुसावळ यांना पाठविण्यात आल्या आहेत. या निवेदनावर ॲड. पुरुषोत्तम डांगरा, सामाजिक कार्यकर्ते वरुण नागपाल, शुभम फारताडे, मयूर मुहना,सुरेश धूत, विश्व हिंदू परिषदेतर्फे विजय राठी, सोमेश कांबळे, दिनेश बानोले, पत्रकार संघ तर्फे राजकुमार व्यास, संजय त्रिवेदी, महेश्वरी युवा संघातर्फे अंकुश चांडक, अग्रवाल युवा संघातर्फे राहुल अग्रवाल, छक्रष्टष्ट सदस्य राजेशजी अग्रवाल, गोपाल गांधी, ॲड. मनोज जैन यांच्यासह इतर नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने तातडीने दखल घेऊन ०७६०५ गाडीचा शेगाव येथे थांबा मंजूर करावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# नरसिम्हा स्पोर्ट्स अकॅडमीत जिल्हास्तरीय चेस्टोबॉल व नेटबॉल प्रशिक्षण शिबिर उत्साहात

प्रतिनिधी 1 ऑक्टोंबर

**शेगाव :** विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा कौशल्य विकसित करण्यासोबतच त्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावर चमकण्याची संधी मिळावी, या उद्देशाने नरसिम्हा स्पोर्ट्स अकॅडमी, शेगाव येथे जिल्हास्तरीय चेस्टोबॉल व नेटबॉल क्रीडा प्रशिक्षण शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीपणे पार पडले. खामगाव मार्गावरील माऊली मंगल कार्यालय येथील नरसिम्हा स्पोर्ट्स अकॅडमीच्या परिसरात आयोजित या प्रशिक्षण शिबिरात विद्यार्थ्यांना चेस्टोबॉल व नेटबॉल या क्रीडा प्रकारांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण, खेळातील तंत्रे, नियम तसेच मैदानावरील प्रत्यक्ष खेळाचे मार्गदर्शन देण्यात आले.यावेळी चेस्टोबॉल असोसिएशन ऑफ विदर्भचे सचिव विजय जी. पवार, प्रशिक्षक लोकेश बोंडे, प्रशिक्षक प्रसन्ना चौधरी तसेच विविध



क्रीडा प्रकारांचे मार्गदर्शक, प्रशिक्षक व शिक्षक श्री. विश्वजीत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सातत्यपूर्ण सराव, शिस्त, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल भविष्य घडविण्याचे मार्गदर्शन केले. क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने मार्गदर्शन व प्रोत्साहन देणारे अमर खराटे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण शिबिर यशस्वीपणे संपन्न झाले. या शिबिरामुळे



विद्यार्थ्यांना चेस्टोबॉल व नेटबॉल या क्रीडा प्रकारांची तांत्रिक माहिती मिळून त्यांच्या क्रीडा कौशल्याला नवी दिशा मिळाली. ग्रामीण व जिल्हास्तरावरील खेळाडूंना योग्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून पुढे जाण्यासाठी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचे यावेळी मान्यवरांनी सांगितले.

# मोबाईलसाठी पैसे दिले नाही म्हणून पत्नीला मारहाण; निष्पाप चिमुरडीवर फेकले गरम पाणी

## ताजनगर भागातील संतापजनक प्रकार; निर्दयी पित्यावर मलकापूर शहर पोलिसांत गुन्हा दाखल

प्रतिनिधी 1 ऑक्टोंबर

**मलकापूर :** मोबाईल खरेदी करण्यासाठी भावाकडून पैसे मागून आण, या कारणावरून पत्नीशी वाद घालून तिला शिवीगाळ करत चापट-बुक्क्यांनी मारहाण केल्याची आणि संतापाच्या भरात शेगडीवरील उकळते गरम पाणी स्वतःच्याच चिमुरड्या मुलीवर फेकून तिला भाजल्याची संतापजनक घटना मलकापूर शहरातील ताजनगर भागात घडली आहे. याप्रकरणी पीडित महिला आणि तिच्या कुटुंबाला जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या संशयित आरोपी पतीविरुद्ध मलकापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ताजनगर येथील रहिवासी नजीराबी शेख नईम (वय २५) या २९ सप्टेंबर रोजी दुपारी १:३० वाजताच्या सुमारास पती शेख नईम शेख रहीम (वय २८) व मुलाबाळांसह घरी हजर होत्या. दरम्यान, पती शेख नईम याने नजीराबी यांना आंघोळीसाठी पाणी गरम करण्यास सांगितले. त्यानुसार त्यांनी घरातील इलेक्ट्रिक शेगडीवर पाणी गरम करण्यासाठी ठेवले व मुलांना जेवण वाढू लागल्या. त्याचवेळी संशयित आरोपी पतीने, "मला मोबाईल घेण्यासाठी पैसे हवे आहेत, तू तुझ्या भावाकडून पैसे मागवून आण," असा तगादा लावला. त्यावर नजीराबी यांनी "माझा भाऊ मजुरीचे काम करतो, तो कुठून पैसे देणार?" असे विचारले. या उत्तराचा राग आल्याने संशयित आरोपी पतीने नजीराबी यांना अवाच्य भाषेत शिवीगाळ करत चापट-बुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. एवढ्यावरच न थांबता क्रूरतेची हद्द पार करत त्याने शेगडीवर ठेवलेले उकळते गरम पाणी स्वतःची लहान मुलगी अरशनबी हिच्या अंगावर फेकले. उकळते पाणी अंगावर पडल्याने निष्पाप मुलगी वेदनेने जोरजोरात ओरडू लागली.

**मध्यस्थी करणाऱ्यांना आणि कुटुंबाला जिवे मारण्याची धमकी**

मुलीचा आरडाओरडा ऐकून परिसरातील जमीरखान सलीमखान व सैय्यद फैजान सैय्यद बुडन यांनी तात्काळ घरात धाव घेत भांडण सोडवले. यानंतरही संशयित आरोपी पतीने पत्नी व संपूर्ण कुटुंबाला जीवाने मारून टाकण्याची थेट धमकी दिली. याप्रकरणी पीडित महिला नजीराबी शेख नईम यांच्या लेखी तक्रारीवरून मलकापूर शहर पोलीस ठाण्यात आरोपी पती शेख नईम शेख रहीम याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (क्वहस्) कलम ११५, ११५(२), ३५१(२), ३५२ अन्वये गुन्हा नोंद (अप.न. ७२४/२०२६) करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचे दाखल अधिकारी म्हणून पोलीस हेका अमोल शेले यांनी काम पाहिले असून, ठाणेदारांच्या आदेशानुसार पुढील तपास पोलीस हेका सुपेश झालटे करत आहेत.

# अमरावती जिल्ह्याच्या वाहनांची अकोल्यात फिटनेस टेस्ट....!

## अकोला आरटीओ कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोला:** अमरावती जिल्ह्यातील बडनेरा जवळील अंजनगाव बारी येथील प्रादेशिक परिवहन विभागाचे (आरटीओ) वाहन तपासणी आणि चाचणी केंद्र तात्पुरते बंद करण्यात आले आहे. येथे चार ट्रॅकवर दररोज सुमारे १०० वाहनांची योग्यतेसाठी तपासणी केली जात होती. केंद्र बंद झाल्यामुळे, अमरावती जिल्ह्यातील वाहन मालकांना आता योग्यता अर्थात फिटनेस प्रमाणपत्रासाठी आपली वाहने अकोला येथे आणावी लागतील. अकोला आरटीओ विभागाकडे आधीच कर्मचाऱ्यांची कमी असल्याने त्यात अमरावतीची वाहने सुद्धा फिटनेस टेस्ट साठी अकोल्यात येत असल्याने कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण वाढला आहे.



### ऑनलाइन प्रणालीद्वारे तारीख आरक्षित करणे आवश्यक

ज्या वाहनांच्या फिटनेस प्रमाणपत्रांची मुदत संपली आहे किंवा संपणार आहे, ते वाहन मालक वेळेवर ऑनलाईन अपॉइंटमेंट बुक करून आपली वाहने अकोला येथे आणत आहेत.

### जमिनीची एनओसी न मिळाल्याने जागेचे रखडले हस्तांतरण

अमरावती शहरातील मेघे कॉलेजच्या मागे असलेल्या या केंद्रासाठीची जमीन पूर्वी महाराष्ट्र राज्य वीज मंडळासाठी आरक्षित होती. मंत्रालय स्तरावर ती आरटीओकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. विभागाने केंद्रावर अत्याधुनिक संगणकीकृत फिटनेस चाचणी यंत्रणा बसवली असून तेथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. तथापि, आरक्षणाचे हस्तांतरण अपूर्ण राहिल्याने फायर एनओसी मिळू शकली नाही. आरटीओच्या माहितीनुसार, येथे दररोज १०० वाहनांची तपासणी केली जात होती. सध्या, नागपूर आणि अकोला केंद्रांवर वाहन फिटनेस चाचण्या घेतल्या जात आहेत. परंतु अकोला अमरावतीच्या जवळ असल्यामुळे, जिल्ह्यातील वाहन मालकांना त्यांच्या चाचण्या अकोला येथे करून घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे.

### ८-१० दिवसांपर्यंत अकोला आरटीओ कर्मचाऱ्यांना कामाचा ताण

अमरावती येथील जमीन आरक्षणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर फायर एनओसी मिळण्याची अपेक्षा आहे. यानंतर, अंजनगाव बारी केंद्र लवकरच पुन्हा सुरू होईल अशी माहिती आरटीओ विभागातर्फे दिली जात आहे त्यामुळे काही दिवसांसाठी अकोला आरटीओ विभागातील कर्मचाऱ्यांना कामाचा ताण सहन करावा लागणार आहे




# अकोला पूर्व मतदारसंघात कोरड्या दुष्काळाची भीषणता

## आमदार रणधीर सावरकर यांनी घेतला आढावा



प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोला:** अकोला पूर्व विधानसभा मतदारसंघात पावसाने पाठ फिरवल्याने कोरड्या दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर आमदार रणधीर सावरकर यांनी टाकळी बुद्रुक, हनवाडी, किनखेड या गावांमध्ये शेतात जाऊन दुष्काळी परिस्थितीची पाहणी केली.
शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांनी पिकांची अवस्था, जमिनीतील ओलावा आणि पाणीटंचाईच्या समस्येची माहिती घेतली. यावेळी गावातील शेतकऱ्यांसोबत सविस्तर संवाद साधत त्यांच्या व्यथा, अडचणी आणि मागण्या जाणून घेतल्या.
हिंदुस्थानचा शेतकरी हा देशाचा कणा आहे. आज निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकरी संकटात आहे, पण या संकटात आम्ही त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत," असे मत आमदार सावरकर यांनी व्यक्त केले.
येणाऱ्या काळात केवळ शेतीच नव्हे तर पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन पाणीपुरवठा विभाग, जिल्हा प्रशासन आणि सर्व संबंधित यंत्रणांशी तातडीने संपर्क साधून दुष्काळावर कशी मात करता येईल याचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले. प्रत्येक गावात पाण्याचे टँकर, विहिरींचे खोलीकरण आणि जलसंधारणाची कामे तातडीने हाती घेण्याबाबतही त्यांनी सांगितले. सरकार लवकरच दुष्काळी परिस्थितीचा अहवाल घेऊन शेतकऱ्यांना मदत जाहीर करणार असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि खासदार अनुप धोत्रे पालकमंत्री आकाश फुंडकर हे स्वतः या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत, असेही त्यांनी सांगितले.यावेळी भाजपचे पदाधिकारी विनोद मंगळे, मधुकर पाटकर, विवेक भरणे, मंगेश घुले, टाकळीचे सरपंच निळकंठ वसू, अनिल इंगळे, संतोष फसाले, वासुदेव पाटकर, अनिल फसाले, समाधान येरोकार यांच्यासह परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टॉवर ते रतनलाल प्लॉट चौकादरम्यानचे पथदिवे बंद...

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोला :** महानगरातील अनेक भागातील पथदिवे रात्रीच्या वेळेस बंद असल्यामुळे प्रवाशांसह नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. तसेच अंधाराचा फायदा घेत अनुचित घटना घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे अपघाताचाही प्रसंग उद्भवू शकतो. बुधवारी संध्याकाळी टॉवर चौक ते रतनलाल प्लॉट चौक या मार्गावरील पथदिवे बंद होते. त्यामुळे या भागातील रहिवाशांसह प्रवाशांना त्रास सहन करावा लागला. याची दखल घेण्यात येऊन या भागातील पथदिवे चालू करण्यात यावे, अशी मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# खदान ते खड़की भागातील अतिक्रमण काढले....

## मुख्य रस्ता मोकळा करण्यासाठी केली कारवाई



प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोला.** अकोला महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने आज आपला मोर्चा खदान ते खडकी या वर्दळीच्या मार्गाकडे वळवला. रस्त्याच्या दोन्ही बाजूला विक्रेत्यांनी दुकाने थाटली होती. त्यामुळे रहदारीला अडथळा निर्माण होता. ही अडचण दूर करण्यासाठी अतिक्रमण हटवले. खदान ते खडकी मार्गावर येणाऱ्या जाणाऱ्यांची नेहमी गर्दी असते. परंतु अतिक्रमण करणाऱ्यांमुळे नागरिकांची गैरसोय होत होती. फळे, भाजी तसेच अन्य विक्रेत्यांनी झाडाखाली पाल बांधून व्यवसाय सुरू केला होता. यामुळे रहदारीला अडथळा निर्माण झाल्याने बुधवारी सकाळ पासून या भागात कारवाई करण्यात आली. त्यामुळे हा रस्ता सध्या तरी मोकळा श्वास घेताना दिसत आहे.

# मालमत्ता खरेदी विक्रीसाठी आता आधार कार्ड अनिवार्य...

## आज 1 ऑक्टोबरपासून नवा नियम लागू

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोला :** कोणतीही मालमत्ता खरेदी विक्री करण्यासाठी व फसवणूक टाळण्यासाठी तसेच कोणत्याही दस्त नोंदणीसाठी आता आधार ओळखपत्र महसूल विभागाने अनिवार्य केले आले. आधार नसेल तर दस्तनोंदणी होणारच नाही, असे महसूल विभागाने स्पष्ट केले. मालमत्ता खरेदी विक्रीतील फसवणूक टाळण्यासाठी हा निर्णय शासनाने घेतला आहे. यासंदर्भात राजपत्र प्रसिद्ध करण्यात आले असून एक ऑक्टोबरपासून याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

### फसवणूक टाळण्यासाठी शासनाचा निर्णय

महसूल विभागांतर्गत काम करणाऱ्या नोंदणी व मुद्रांक विभागातर्फे स्थावर मालमत्तांच्या दस्तनोंदणीची प्रक्रिया पार पाडली जाते. खोटे साक्षीदार, खोटे पक्षकार उभे करून होणारी फसवणूक आता हद्दपार होईल. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन फसवणुकीचे प्रकार टळतील आणि कामकाज अधिक पारदर्शक होण्यास मदत होईल." वाटणी करताना ज्यांचा आधार क्रमांक नाही त्यांनी आधार नोंदणी केल्याची पावती व त्यासोबत अन्य सरकारी ओळखपत्रे तसेच व्यवहार होत असलेल्या संबंधिताचे नाते सिद्ध करणारी कागदपत्रे अर्जासोबत जोडावी लागतील.

### विशेष घटकांसाठी नियम

अठरा वर्षांखालील मुलांच्या बाबतीत त्यांच्या माता-पिता किंवा कायदेशीर पालकांच्या संमतीनेच आधार नोंदणी अर्ज केला जाईल. केवळ आधार क्रमांक उपलब्ध नसल्याच्या कारणावरून कोणत्याही बालकाला किंवा पात्र लाभार्थीला दस्तनोंदणीच्या लाभापासून वंचित ठेवले जाणार नाही, अशी तरतूद या अधिसूचनेत करण्यात आली आहे.

# शाळेसमोरच एक्सपायरी झालेले इंजेक्शन फेकले

## विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी चालला खेळ

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोला:** अकोला महानगरपालिका 7 नंबर शाळेसमोर
एक्सपायरी झालेले इंजेक्शन फेकलेले दिसून आले. लहान मुले या भागात खेळतात. चुकीने इंजेक्शन हाताळले तरी गंभीर परिणाम होऊ शकतात.
परंतु संबंधितांना ही जाणीव नाही का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. अशा प्रकारे चाललेला खेळ थांबावा अशी मागणी होत आहे.
बायोलॉजिकल वेस्टची विल्हेवाट योग्य प्रकारे लावावी लागते. कोठेही फेकता येत नाही. पूर्वी बडनेरा येथे डिस्पोजेबल युनिट



होते. परंतु आता खामगाव येथे व्हाईट केअर सेंटर आहे. त्या ठिकाणी या भागातील बायोलॉजिकल वेस्ट एकत्र करून पाठवावे लागते. जिल्हा न्यायालय समोरील महापालिका सात नंबर शाळेसमोर टाकलेले इंजेक्शन कोणी फेकले त्याची चौकशी करावी अशी मागणी या भागातील नागरिक तसेच पालक करीत आहेत.

# सरपंच कविता विठ्ठल मंगळे राज्यस्तरीय महाराष्ट्ररत्न पुरस्काराने सन्मानित

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोट:** पुणे शहरातील नालंदा ऑग्रानायझेशन संस्थेकडून 'महाराष्ट्ररत्न गुणगौरव सन्मान सोहळा' २७ सप्टेंबर रोजी पुण्यातील नवी पेठ येथील पत्रकार भवन येथे उत्साहात झाला. प्रमुख पाहुणे म्हणून चित्रपट असोसिएशनचे अध्यक्ष नितीन दवणे, ए.आर.जे. एशिया ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे चेअरमन जितेंद्र दाते आणि वृक्ष अभ्यासक वंदना जाधव उपस्थित होते. सरपंच पती विठ्ठल मंगळे, जितापूर गावच्या सरपंच सौ. कविता मंगळे यांना सर्व पाहुण्यांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, मानपत्र आणि मेडल देऊन मान्यवरांच्या हस्ते




गौरविण्यात आले. "राज्यभरात उत्तम काम करणाऱ्या लोकांना एका व्यासपीठावर आणणे आणि त्यांच्या माध्यमातून भविष्यात विविध गावांमध्ये सामाजिक योजना राबवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे," असे आयोजकांनी यावेळी नमूद केले.या सोहळ्यात कला आणि सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय, महसूल, आरोग्य, कृषी, समाजसेवा आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांचा समावेश होता. पुरस्काराला उत्तर देताना अनेक गुणवंतांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आणि हा सन्मान भविष्यात अधिक जोमाने काम करण्यासाठी ऊर्जा देणारा असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन संस्थेच्या प्रतिनिधींनी केले.

# तेल्हारा शहरात गतिरोधक बसविण्याची गरज....

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**तेल्हारा :** सद्यस्थितीत वाढत्या अपघातांची श्रृंखला बघता तेल्हारा शहरात तसेच मोठं मोठ्या कार्यालयासमोर गतिरोधक बसविण्याची निनांत गरज बनली आहे. तेल्हारा शहरात कीरकोळ ते गंभीर स्वरूपाचे अपघात घडत आहेत. बेलखेड रोड गाडेगाव रोड शेगाव रोड वरवट बकाल रोड अशा तेल्हारा शहरातुन बाहेर निघणार्या सर्व रस्त्यांवर गतिरोधक बसविण्याची जनतेतून मागणी केल्या जात आहे. तेल्हारा शहरातील डॉ बाबासाहेब आंबेडकर उद्यान चौक येथे अपघाताची दाट शक्यता असुन या ठिकाणी तीन ते चार गतिरोधक बसविण्याची गरज आहे. शेगाव कडुन आणि बेलखेड हिवरखेड कडुन सुसाट वेगाने वाहने धावतात त्यामुळे मध्येच एखादे गाडेगाव कडील वाहन आले तर खुप मोठा अपघात होऊन जीवीतहानी होऊ शकते त्यात प्रामुख्याने याच चौकातून विद्यार्थी वर्ग आपल्या सायकलने शाळेत येजा करतात अशावेळी विद्यार्थ्यांच्या जिवीताचा प्रश्न निर्माण होत आहे.तरी प्रशासनाने तेल्हारा शहरातील आवश्यक त्या त्या सर्व ठिकाणी प्रामुख्याने गतीरोधक बसवावे नाहीतर एखाद्या अपघाताच्या अनुचित घटनेनंतर प्रशासन जागे झाल्यास नंतर प्रशासन जबाबदारी घेणार का? हा प्रश्न जनतेतून विचारला जात आहे.

# 'पाणी जपून वापरा' प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोला :** यंदा अल्प पर्जन्यमानामुळे अकोला जिल्ह्यातील जलसाठ्यांवर गंभीर परिणाम झाला असून, आगामी काळात पाणीटंचाई तीव्र होण्याची शक्यता आहे. यामुळे नागरिकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांनी केले.
जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईचा आढावा घेण्यासाठी नावंदर यांनी मंगळवारी महान, दगडपारवा धरण तसेच उनई बंधारा आणि सुकळी येथील जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. यावेळी धरणांमधील सद्य त्यांनी जलसाठा, स्थिती आणि आगामी काळातील नियोजनाची माहिती घेतली.
अल्प पावसामुळे धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. त्यामुळे संभाव्य टंचाईवर मात करण्यासाठी पर्यायी जलस्रोतांचा शोध घेण्यासह विविध उपाययोजनांना प्रशासनाने सुरुवात केली आहे.
दरम्यान, पाणी उपलब्धतेची परिस्थिती आणखी गंभीर झाल्यास ६४ खेडी पाणीपुरवठा योजनेतील गावांच्या पाणीपुरवठ्यात आवश्यकतेनुसार कपात करण्याची वेळ येऊ शकते, असे संकेतही त्यांनी दिले. त्यामुळे ग्रामीण भागात आतापासूनच पाण्याच्या वापराबाबत खबरदारी घेण्याची गरज निर्माण झाली आहे.
उनई बंधाऱ्यातील गाळ उपसा तसेच आवश्यक देखभाल दुरुस्तीची कामे तातडीने करण्याच्या सूचना नावंदर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. पाणीटंचाईचे टाळण्यासाठी प्रशासनाकडून संकट उपाययोजना सुरू असल्या तरी नागरिकांनीही पाण्याचा अपव्यय टाळून उपलब्ध साठ्याचे जतन करणे आवश्यक असल्याचे नावंदर यांनी स्पष्ट केले.
पाहणीदरम्यान ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल साळुंके, उपअभियंता कांचन उमाळे, उपअभियंता अंकित जाधव यांच्यासह कनिष्ठ अभियंते व स्थानिक कर्मचारी उपस्थित होते.

# महानगराला मिळणार १२ दिवसांआड पाणी!

## मनपाचा प्रस्ताव; काटेपूर्णात केवळ 20 टक्केच जलसाठा

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोला :** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा सिंचन प्रकल्पातील जलसाठा झपाट्याने कमी होत आहे. सध्या प्रकल्पात केवळ २०.०२ टक्के जलसाठा शिल्लक असून, गतवर्षी याच कालावधीत धरणात ९७.१५ टक्के जलसाठा उपलब्ध होता. उपलब्ध जलसाठ्याचे नियोजन करण्यासाठी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने सुधारित पाणीपुरवठा वेळापत्रक तयार केले आहे. या प्रस्तावित वेळापत्रकानुसार शहराला १२





दिवसांआड पाणीपुरवठा केला जाणार आहे.
काटेपूर्णा प्रकल्प हा अकोला शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रमुख स्रोत आहे. प्रकल्पाची एकूण क्षमता ८६.३४ दशलक्ष घनमीटर असून, सध्या केवळ १८.६० दशलक्ष घनमीटर पाणी उपलब्ध आहे. काटेपूर्णा प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात यंदा फक्त २२२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सध्याच्या नियोजनानुसार उपलब्ध जलसाठा जानेवारीपर्यंत पुरेल, असा अंदाज आहे. मात्र, पावसाने आणखी दडी मारल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते. त्यामुळे शहराला १२ दिवसांतून एकदाच पाणीपुरवठा करण्याची वेळ येऊ शकते, असा इशारा जलसंपदा विभागाने दिला असून, त्यासाठी आवश्यक परवानगीही आयुक्तांकडे मागितली आहे. येत्या एक-दोन दिवसांत याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.
काटेपूर्णा प्रकल्पातून दर महिन्याला सुमारे ३.५० दशलक्ष घनमीटर पाणी सोडले जाते. म्हणजेच दररोज सुमारे १२ कोटी लिटर पाण्याचा वापर होत असल्याची माहिती जलसंपदा विभागाने दिली आहे. त्यामुळे उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे गरजेचे असल्याचे विभागाने स्पष्ट केले. दरम्यान, संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन प्रशासन स्तरावर बैठका सुरू आहेत. टंचाई निवारणासाठी पाणी व्यवस्थापनाचे नियोजन करण्यात येत आहे.

### मनपाचा प्रस्ताव...

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने तयार केलेले वेळापत्रक महापालिका आयुक्तांच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आले असून, मंजुरी मिळाल्यानंतर त्यानुसार पाणीपुरवठा केला जाणार आहे. प्रस्तावित वेळापत्रकानुसार शहराच्या मूळ हद्दीत दहा दिवसांच्या अंतराने, म्हणजे अकराव्या दिवशी पाणीपुरवठा होईल. तर हद्दवाढ भागातील नागरिकांना अकरा दिवसांच्या अंतराने, म्हणजे बाराव्या दिवशी पाणी मिळण्याची शक्यता आहे. सध्या अकोला शहराला पाच दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे.

# शिक्षक मतदारसंघ निवडणुकीचा दुसरा दिवसही निरंक..

प्रतिनिधी १ ऑक्टोबर

**अकोला :** शिक्षक मतदारसंघ निवडणूक - २०२६ च्या अनुषंगाने जिल्ह्यात २९ सप्टेंबरपासून नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरूवात झाली आहे. मात्र दोन दिवसात एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही. मंगळवारी पहिल्या दिवशी २० उमेदवारांकरिता ४४ नामनिर्देशनपत्रांची उचल झाली आहे तर बुधवार, ३० सप्टेंबरला दुसऱ्या दिवशी दुपारी ३ वाजेपर्यंत एकही नामनिर्देशन पत्र दाखल झाले नाही. मात्र १९ उमेदवारांकरिता ४० नामनिर्देशनपत्रांची उचल करण्यात आली आहे. त्यामुळे दोनही दिवस एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केला नाही.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135